रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १३५ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in



शुभ दीपावली

साडेतीन मुहूर्तांचे वलय आहे.
उत्तम दिनाचे महात्म्य आहे.
सुखद ठरो हा छान पाडवा,
त्यात असूदे अवीट गोडवा.

बलिप्रतिपदा,
पाडवाव्याच्या
हार्दिक शुभेच्छा!

रायगड, बुधवार, दि. २२ ऑक्टोबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

**उद्या अंक नाही!**
दिवाळी पाडव्यानिमित्त बुधवार, दि. २२ ऑक्टोबर २०२५ रोजी कृषीवल कार्यालयाला सुट्टी असल्याने गुरुवार, दि. २३ ऑक्टोबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची सर्व वाचक, वितरक, जाहिरातदार व हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.
- मुख्य संपादक

## वेधक

### ट्रेडिंग फ्रॉड प्रकरण; चौघांना अटक

**मुंबई :** ऑनलाईन शेअर मार्केटच्या माध्यमातून जादा नफा देण्याच्या आमिषाने लोकांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी चार जणांना बंगळुरू सायबर पोलिसांनी अटक केली आहे. ऑनलाईन शेअर ट्रेडिंग फ्रॉडविरोधात मुंबई सायबर कक्षाची ही मोठी कारवाई मानली जात आहे. बंगळुरूच्या डिजिटल मार्केटिंग कंपनीच्या चार उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. डिजिटल मार्केटिंग कंपनी 'व्हॅल्यू लिफ'च्या अधिकाऱ्यांनी सायबर फ्रॉडमध्ये गुंतलेल्या हाँगकाँगच्या कंपनीला मदत केल्याचा आरोप ठेवत त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आलीय. ऑनलाईन शेअर ट्रेडिंग फ्रॉडविरोधात ही पहिलीच कारवाई असल्याचे समजते.

### फेक कॉल प्रकरणात पोलीस अधिकारी रडारवर

**रायगड :** बनावट कॉल सेंटरद्वारे परदेशातील लोकांना विविध आमिषे दाखवून मोठ्या प्रमाणावर आर्थिक गंडा घालण्यात आला होता. सायबर यंत्रणेला डिजिटल ट्रॅकिंगच्या माध्यमातून आयपी अ‍ॅड्रेस शोधण्यात यश आले आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील तत्कालीन वरिष्ठ पोलीस अधिकारी व विद्यमान पोलीस निरीक्षकांचा समावेश आहे. त्यामुळे हे दोघे सीबीआयच्या रडारवर असल्याची चर्चा आहे. लवकरच हे प्रकरण अधिक उघड होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. रायगड जिल्ह्यामध्ये फेक कॉल सेंटर चालविली जात होती. कॅनडा, यूएसए या देशातील नागरिकांना वेगवेगळी आमिषे दाखवून •➤पान २ वर

### दाऊदच्या जमिनीचा होणार लिलाव

**खेड :** कुख्यात डॉन दाऊद इब्राहिमच्या कोकणातील जमिनीची सरकारकडून लिलावात विक्री केली जाणार आहे. हा लिलाव ४ नोव्हेंबर रोजी होणार आहे. खेडमध्ये दाऊदचं मूळ गाव असून तिथं दाऊदनं जमीन विकत घेतली होती, तसंच बंगलाही बांधला होता, पण ही सगळी संपत्ती आता लिलावात विकली जाणार आहे. खेडमध्ये दाऊदच्या चार जमिनी आहेत. त्यापैकी एका जमिनीची किंमत ९ लाख ४१ हजार २८० रुपये, तर दुसऱ्या शेतजमिनीची किंमत ८ लाख ८ हजार ७७० रुपये इतकी ठेवण्यात आली आहे. मुंबके गावात दाऊदच्या आईच्या नावावर एक बंगला आहे. तर लोटेमध्ये पेट्रोल पंपाची जागा आहे.



लक्ष्मीपूजनाच्या दिवशीच

# गृहलक्ष्मी हरपल्या!

## कामोठे, वाशीमध्ये भीषण आग । सहा जणांचा मृत्यू

**राज्यभरात दिवाळी उत्साहात साजरी होत असताना लक्ष्मीपूजनाच्या दिवशीच नवी मुंबईतील कामोठे आणि वाशी परिसरात लागलेल्या भीषण आगीत घरच्या गृहलक्ष्मींचा होरपळून मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे दिवाळीच्या आनंदावर विरजण पडले आहे. या दुर्दैवी घटनांमुळे शिसोदिया आणि जैन कुटुंबियांनी आपले सर्वस्व गमावले असून, आनंदाला दुःखाची किनार लागली आहे. या घटनांमुळे नवी मुंबई परिसर हादरला असून, अनेकांना अश्रू अनावर झाले. प्रकाशमान आनंदाच्या सणाला या आगीमुळे गालबोट लागले.**

### कामोठ्यात मायलेकीचा मृत्यू



**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**
कामोठे वसाहतीत अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. सिलिंडर स्फोटामुळे लागलेल्या आगीत आई आणि लेकीचा मृत्यू झाला आहे. दिवाळीच्या सणात घडलेल्या या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. कामोठे येथील सेक्टर ३६ मधील आंबे श्रद्धा सहकारी सोसायटीत सकाळी सहाच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत आई-मुलगी जिवंत होरपळून मरण पावल्या. सिलिंडरचा स्फोट झाल्याने ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, कामोठे येथील •➤पान २ वर

### वाशीतील अग्नितांडवात चौघांचा मृत्यू

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**
वाशी येथील रहेजा रेसिडन्सी या इमारतीला लागलेल्या आगीमध्ये चार जणांचा मृत्यू झाला. वेदिका सुंदर बालकृष्णन (वय ६), कमला हिरल जैन (वय ८४), सुंदर बालकृष्णन (वय ४४) आणि पूजा राजन (वय ३९) अशी मृतांची नावे आहेत. या दुर्घटनेत सुंदर बालकृष्णन, पूजा राजन आणि त्यांची सहा वर्षांची मुलगी वेदिका यांचा होरपळून मृत्यू झाला. ऐन दिवाळसणात या कुटुंबाचा दुर्दैवी अंत झाल्याने वाशी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. •➤पान २ वर




बनावट नोटा प्रकरणात नवा ट्विस्ट

## भूषणला कोणताही आजार नव्हता

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
**मागील दहा वर्षांत माझ्या भावाला कोणताही आजार नव्हता. त्याला कोणत्याही प्रकारचे औषध वा गोळी सुरू नव्हती. त्याला फीटचा आजार असता तर तसे औषधोपचार सुरू असते. पण, असा कोणताही आजार नव्हता, असा दावा बनावट नोटाप्रकरणी संशयित आरोपी म्हणून अटक करण्यात आलेला आणि उपचारादरम्यान मृत्यू पावलेल्या भूषण पतंगेचा भाऊ मनोज पतंगे यांनी केला आहे. भूषणच्या पत्नीनेसुद्धा याला दुजोरा दिला आहे. तिनेसुद्धा भूषणला कोणत्याही प्रकारचे औषध वा गोळी सुरू नसल्याचे सांगितले आहे.**

माझा नवरा आरोपी आहे की नाही, ही बाब न्यायालयात सिद्ध होईल ना! पोलिसांचे काम तपासाचे असून, त्यांनी तो करावा. जेव्हा भूषणला अटक झाली, तेव्हा तो चालत गेला. तो जर आजारी असता, •➤पान २ वर

### शवविच्छेदनापासून आम्हाला लांब ठेवले

भूषणचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असे आम्हाला सांगण्यात आले. आमच्यासाठी हा मोठा धक्का होता. आम्ही जेव्हा भूषणला पाहिले, तेव्हा त्याच्या कमरेवर आणि मागच्या बाजूला तर जखमा झाल्या होत्या. पोलिसांनी मारले नाही, मग या जखमा कसल्या होत्या? त्यानंतर त्याठिकाणी उपस्थित पोलिसांनी आम्हाला भूषणच्या शवविच्छेदनाच्या वेळी कुटुंबातील एका उपस्थित राहावे लागेल, असे सांगितले. आम्ही होकार दिला होता, असे भाऊ मनोज यांनी सांगितले. भूषणचा मृत्यू शुक्रवारी झाला; परंतु त्यादिवशी त्याचे शवविच्छेदन न करता, मृतदेह शवागरात ठेवण्यात आला. त्याचे शवविच्छेदन शनिवारी कुटुंबाला विश्वासात न घेताच करण्यात आले, यामागचे गौडबंगाल काय? आम्हाला या शवविच्छेदनापासून लांब का ठेवण्यात आले? असा प्रश्न भूषणची पत्नी आणि भावाने उपस्थित केला आहे.

**शुक्रवारच्या अंकात : कुटुंबियांचा प्रश्न : विशाल मोरे कोण? पोलीस आणि त्याचा संबंध काय?**

## लाडक्या भावांचा सरकारला चुना

- **१२ हजार भावांनी घेतला लाडकी बहीण योजनेचा लाभ**
- **१६४ कोटींचा घोटाळा समोर**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील आणखी एक घोटाळा समोर आला आहे. फक्त महिलांसाठी सुरू केलेल्या या योजनेत तब्बल १२ हजार ४३१ पुरुषांनी चुकीच्या पद्धतीने लाभ घेतल्याचं उघड झाले. लाडकी बहीण योजनेतून दर महिन्याला १५०० रूपये आर्थिक सहाय्य केले जाते. आरटीआयच्या माहितीनुसार, योजनेतील लाभार्थ्यांची पडताळणी सुरू आहे. त्यात १२ हजारांहून अधिक पुरुषांनी योजनेचा लाभ घेतल्याचं समोर आले.

याबाबत महिला बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुष्टी केली. तपासानंतर या लाभार्थ्यांची नावे यादीतून वगळण्यात आली. •➤पान २ वर

### वसुली नाहीच

पुरुष लाभार्थ्यांनी जुलै २०२४ ते जुलै २०२५ या काळात लाडकी बहीण योजनेचे पैसे घेतले. जुलै २०२५ नंतर ही रक्कम बंद करण्यात आली. परंतु, या पुरुष लाभार्थ्यांकडून सरकारने वसुली केली नाही. ज्या कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न २.५० लाखांहून अधिक होते किंवा एका कुटुंबात दोन किंवा त्याहून अधिक सदस्यांनी योजनेचा लाभ घेतला, अशा ७७ हजार महिलांना योजनेतून अपात्र ठरवण्यात आले. घोटाळा रोखण्यासाठी राज्यव्यापी ई-केवायसी मोहीम सुरू केली आहे.

## ज्येष्ठ अभिनेते असरानी यांचे निधन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते असरानी यांचं सोमवारी निधन झालं. वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांनी दुपारी चार वाजताच्या सुमारास अखेरचा श्वास घेतला. दीर्घकाळापासून फुफ्फुसांच्या आजाराने त्रस्त असलेल्या असरानींवर रुग्णालयात उपचार सुरु होते.



असरानींच्या निधनाची बातमी समोर येताच चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली आहे. त्यांचे मॅनेजर बाबुभाई यांनी सांगितलं की, दीर्घकाळापासून फुफ्फुसांच्या आजाराने त्रस्त ते त्रस्त होते. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. असरानी यांनी त्यांच्या कारकीर्दीत शेकडो चित्रपटांमध्ये काम केलं. १ जानेवारी १९४१ रोजी जयपूर येथे जन्मलेले असरानी यांनी जयपूरमधील सेंट झेवियर्स स्कूलमध्ये शिक्षण घेतलं आणि नंतर राजस्थान कॉलेजमधून पदवी प्राप्त केली. १९६७ मध्ये 'हरे कांच की चुडियां' या चित्रपटातून त्यांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. यानंतर कधीही मागे वळून पाहिलं नाही.

## वरुडेंची आत्महत्या

### जि.प.वेतन फरकाच्या घोटाळ्याला नवी दिशा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**
रायगड जिल्हा परिषदेच्या वेतन फरकाच्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्यातील आरोपीने अलिबागमध्ये मेहुण्याच्या घरातच आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनेने चर्चेला उधाण आले आहे. आत्महत्या करण्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.



ज्योतीराम पांडुरंग वरुडे असे या मृत व्यक्तीचे नाव आहे. हे मूळचे माणगाव तालुक्यातील इंदापूर येथील रहिवासी आहेत. गेल्या आठ दिवसांपूर्वी ते अलिबागमधील विद्यानगर येथील मेहुण्याकडे गेले होते. रविवारी (दि.१२) ऑक्टोबरला घरात असताना त्याने विषारी कीटकनाशक औषध खाल्ले. त्यानंतर त्याला उलटी आली. त्यांना तात्काळ जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. रुग्णालयात उपचार सुरु असताना सोमवारी (दि.२०) सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास त्यांचा उपचारादम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. ज्योतीराम वरुडे हा इसम जिल्हा परिषदेमध्ये नोकरीला होता. वेतन फरकाच्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळा प्रकरणातील तो आरोपी आहे.

### माजी आ. राजीव देशमुख यांचे निधन

**। धुळे । प्रतिनिधी ।**
राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार आणि पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष राजीव देशमुख यांच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झालं.



निधनसमयी ते ५५ वर्षांचे होते. राजीव देशमुख यांच्या निधनामुळे राजकारणात एक मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. राजू देशमुख हे चाळीसगाव विधानसभेचे माजी आमदार होते, २००९ ते २०१४ या कार्यकाळात राजू देशमुख हे विधानसभेचे सदस्य होते, मात्र त्यानंतर २०१४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांचे विश्वासू सहकारी अशी राजीव देशमुख •➤पान २ वर




**अवकाळी पावसामुळे भातपीक संकटात** | **शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण**

## ऐन दिवाळीत आनंदावर पाणी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**
जिल्ह्यात भातकापणीचा हंगाम सुरु झाला आहे. शेतकरी भातकापणीसह उडवी रचण्याचे कामात मग्न झाले आहेत. मात्र, मंगळवारी (दि.२१) सायंकाळी अवकाळी पावसामुळे ऐन दिवाळीच्या सणात आनंदावर पाणी पडले आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांसह अनेकांची धावपळ उडाली. दिवाळीनिमित्त फटाके, कंदिलांनी सजलेली दुकाने पावसात भिजल्याने विक्रेत्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. हवामान खात्याने येलो अलर्टचा इशारा दिला असून, नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.



भातपीक बहरून कापणी योग्य झाल्याने ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून भात कापणीला सुरुवात करण्यात आली होती. मात्र, १५ ऑक्टोबरला जिल्ह्यात सायंकाळी पाऊस पडल्याने कापणी केलेले पीक पाण्याखाली आले आहे. त्यानंतर पावसाने विश्रांती घेतली. मागील पाच दिवसांपासून जिल्ह्यात प्रखर उष्णता जाणवत होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी पुन्हा कापणीची कामे सुरु केली. काही ठिकाणी भात कापणी करून उडवी रचण्याच्या कामात शेतकरी मग्न होता. उन्हाच्या तीव्रतेने लोंब्यातून दाणा अलग होत असून, कापणी केली नाही, •➤पान २ वर

### कंदील, फटाके विक्रेत्यांची तारांबळ

दिवाळीनिमित्त फटाके, आकाश कंदिलांनी दुकाने सजली आहेत. बाजारपेठा गजबजलेल्या असताना मंगळवारी सायंकाळी जोरदार वाऱ्यासह पाऊस आला. अचानक आलेल्या पावसामुळे कंदील, फटाके विक्रेत्यांची तारांबळ उडाली. आकाश कंदील, फटाके तसेच फुलेदेखील पाण्यात भिजली. अनेक वस्तू आडोशाला ठेवण्याची वेळ व्यावसायिकांवर आली. त्यामुळे विक्रेत्यांचे प्रचंड नुकसान झाले. पावसापासून या वस्तूंचा बचाव करण्यासाठी अनेकांनी प्लास्टिक कापडाचा आधार घेतला.

# वारद रस्त्याची दुरवस्था

## निकृष्ट दर्जाच्या कामामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी; संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

दरवर्षी पावसाळा आला की रस्त्याची दुरवस्था हे नित्यांचे समिकरण झाले असल्यांचे पहावयांस मिळते. ग्रामीण भागातील गावांना जोडणाऱ्या रस्त्याची चालन झालेल्या अनेक ठिकाणी पहावयास मिळते.रस्त्यात खड्डे की खड्यात रस्ता,किंवा खचणे हे नित्याचे झाले आहे.परिणामी या रस्त्यावर कालांतराने धोक्याचे सावट निर्माण होते. हा रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत माजगाव हद्दीतील असलेला वारद या गावी जाण्यासाठी सन २०२१ साली डांबरीकरण रस्ता निर्माण करण्यांत आला.मात्र या पावसाळ्यात अक्षरश: रस्त्याची चाळण झाल्याचे



पहावयास मिळत आहे.

हा रस्ता ८३० मिटर लांबीचा असून अंदाजे खर्च एक कोटीहून अधिक आला.या रस्त्याच्या काम या ठेकेदार प्रतिक कन्स्ट्रक्शन ठाणे यांनी केले होते. मात्र रस्त्याच्या झालेल्या दुरवस्थेबाबत मौन धारण केल्याचे पहावयास मिळत असल्यामुळे ग्रामस्था नाराजी व्यक्त करीत आहे.ज्या रस्त्याचे काम केले त्या रस्त्याची देखभाल सुद्धा त्यांच्या जवळ असताना याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहे.

ग्रामीण भागात वास्तव्य करीत असलेल्या नागरिकांचा प्रवास सध्या खड्ड्यातून जात आहे. त्याचबरोबर काही ठिकाणी डांबर निघून गेली असून निव्वळ खडी बाहेर आल्याचे पहावयास मिळत आहे. यामुळे हा रस्ता निकृष्ट दर्जाचा झाला आहे.यामुळे रस्त्याचे काम जलद गतीने होवून रस्ता पूर्ण व्यवस्थित करुन द्यावा अशी मागणी होत आहे.

> **वारद गावातील रस्त्याची दुरवस्था निर्माण झाली असून, याकडे सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याचे पहावयास मिळत आहे. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत या रस्त्याचे काम झाले असून, दोन वर्षापूर्वी खड्डे भरुन ग्रामस्थांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. – यशवंत शिंदे, वारद ग्रामस्थ**

# ओढा दूषित, पाणीप्रश्न ऐरणीवर

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

ग्रुप ग्रामपंचायत माजगाव हद्दीतील असलेला खोकर पूल हा सावरोली खारपाडा मार्गावर असून, सध्या या पुलाची अवस्था बिकट आहे. त्यातच या ठिकाणी कामगार वर्ग उरलेले अन्न या नैसर्गिक ओढ्यात टाकत असल्यामुळे पाण्याला दुर्गंधी येत असून, पाणी दूषित झाले आहे. याठिकाणी महिला कपडे धुण्यासाठी त्याचबरोबर मोकाट गुरे तसेच शेतकरी गुरांना पाणी पिण्यासाठी येथे आणतात. मात्र, या ठिकाणी टाकलेल्या अन्नाच्या दुर्गंधीमुळे गुरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



या ठिकाणी नवीन कारखाना उदयास आल्याने येथील कामगार रात्रीचे राहिलेले अन्न सकाळी या ओढ्यात टाकत असल्याचा आरोप येथील ग्रामस्थ करीत आहेत. विशेष म्हणजे, या ठिकाणी पावसाळ्यात खूप पाणी येत असल्यामुळे तेथेच तीन स्मशानभूमी असून, गणपती विसर्जन या ठिकाणी होत असते. यामुळे येथील नागरिक तीव्र संताप व्यक्त करीत आहेत.

उन्हाळा सुरु झाला की हा ओढा कोरडा पडत असतो. मात्र, जोपर्यंत पाणी या ठिकाणी असते, तोपर्यंत येथील ग्रामस्थ या पाण्याचा वापर करतात. परंतु, येथील पाणी आता दूषित होत चालले आहे. या ठिकाणी हे अन्न अनेक दिवस राहिल्यामुळे कुजून दुर्गंधी पसरुन विविध आजार निर्माण होण्याचा धोका संभव आहे. परिणामी, ओढ्यात टाकलेल्या अन्नामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत चालले आहे.

> **सावरोली–खारपाडा इसांबानजीक असलेल्या खोकर पुलाच्या खाली शिल्लक राहिलेले अन्न टाकत असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र, आमच्या कामगारांनी ते टाकलेले नाही. मात्र, तरीसुद्धा या ठिकाणी आम्ही स्वच्छता मोहीम राबविणार आहोत. तसा फलक लावण्यात येणार असून, येथे अन्न टाकू नये, अशी सक्त सूचना करण्यात येणार आहे. – अर्जुन भोसले, व्यवस्थापक, टोयो कोलेन इसांबा**

# बजरंग दलाकडून आदिवासी बांधवांना दिवाळी भेट

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

दीपावलीनिमित्त अखिल आर्यवत संघ, आंतरराष्ट्रीय बजरंग दलाकडून रसायनी पाताळगंगासह आसपासच्या परिसरातील आदिवासी बांधवांना, मुलांना मिठाई, कपडे आणि फटाके ५८० कुटूंबात वाटप करण्यात आले.



पूर्ण देशभरात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दिनेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १००० ठिकाणी व ५ लाख परिवारामध्ये मिठाई व कपडे तसेच फटाके वाटपाचे कार्यक्रम कोंकण प्रांतामधील उरण विधानसभा आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे अध्यक्ष जनार्दन मालुसरे, मावळ लोकसभा प्रसिध्दी प्रमुख राकेश खराडे,खालापूर तालुका अध्यक्ष प्रशांत तांबोळी, उपाध्यक्ष संदीप तांबोळी, सुभाष कोकने, रवींद्र ठाकूर, राजेंद्र चव्हाण, राजेंद्र जांभूळकर, बुआ कातकरी, विजेंद्र घुमडे यांनी मिळून पेरूची वाडी, कालिवली परिसर, रानसई वाडी, खुटळाची वाडी, वडगाव वाडी, डोंगर वाडी, तळवली वाडी, शिवनगर मोहोपाडा वाडी, वाशिवली वाडी यासर्व ठिकाणी दिवाळीची भेट वस्तु वाटप करून धर्मांतर रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे एक नवीन उपक्रम संघटनेने हाती घेतले आहे.

संघटनेचे घोष वाक्य हिंदू एकता हिंदू सन्मान,विजेता हिंदू मृत्युंजय हिंदू या ध्रुव संकल्पनेतून पूर्ण देशभरामध्ये गरीब वस्तीमध्ये दिवाली निमित्त फटाके, मिठाई, कपडे वितरण कार्यक्रम सर्व संघटनेचे पदाधिकारी करत आहेत.

विशेष करून कुठल्याही राजनीती पक्षाची मदत न घेता निस्वार्थ सेवा संघटनेचे कार्यकर्ते करत आहेत, असे जनार्दन मालुसरे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# रेडीमेड गोंडा फुलाच्या हाराला मागणी वाढली

**। उरण । प्रतिनिधी ।**

दिवाळी सणानिमित्ताने गोंडा फुलांना महत्व फार असते. उरण बाजारपेठेतील राजपाल नाका येथे रेडीमेड गोंडा फुलांचे हार विकावयास आले आहेत.

संपूर्ण उरण बाजार पेठेत ठिकठिकाणी गोंडा फुले ८० रुपये किलो या दराने मिळणारा गोंडा आज १०० ते १२० दराने उरण बाजारात मिळू लागला आहे. नागरिक गोंडा खरेदी करताना दिसत आहेत. रेडीमेड गोंडा फुलाचे हार १०० ते १५० रुपये या दराने आम्ही विकतो असे अलिबाग कावाडे येथील रोशनी रवींद्र म्हात्रे व ऋतुजा पाटील (नवखार) यांनी सांगितले.




# अज्ञाताकडून दुचाकीची चोरी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलजमधील करंजाडे टी पॉईंटजवळील ब्रिजच्या खाली उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. दैवदीप गालट यांनी त्यांची ५० हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची होंडा कंपनीची मोटारसायकल क्र. एमएच ४६. बीटी ३३९७ ही करंजाडे टी पॉईंटजवळील ब्रिजच्या खाली उभी करून ठेवली असता ती अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. घरफोडी, वाहनचोरी अशा घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, चोरट्यांना गजाआड करावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

# गौतम बुद्ध स्त्रीस्वातंत्र्याचा पाया रचणारे युगपुरुष : कांबळे

**। वेनगाव । प्रतिनिधी ।**

धम्म मार्गात आलेल्या नागरिकांना स्वतः प्राप्त केलेले ज्ञान देऊन त्यांचे अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न बुद्धाने केला, गौतम बुद्धांनी उपाय कौशल्याचा प्रशस्त परिपूर्ण व अपुनरावृत मार्ग अनुसरून तब्बल ४५ वर्षे भटकंतीतून समाज प्रबोधनाचे कार्य केले, स्त्री व पुरुष असा भेदभाव न करणारे गौतम बुद्ध स्त्री स्वातंत्र्याचा, स्त्रीमूल्यांचा मूलभूत पाया रचणारे पहिले क्रांतिकारक युगपुरुष होते, असे उद्गार उषा कांबळे यांनी कर्जतमध्ये वर्षावास मालिकेच्या सांगता समारोप प्रसंगी काढले.

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा यांच्यावतीने रविवारी (दि. १९) कर्जत अमराई बुद्धविहार येथे वर्षावास प्रवचन मालिकेचा समारोपाचा कार्यक्रम उत्साहत पार पडला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कर्जत तालुका अध्यक्ष प्रकाश गायकवाड यांनी भूषवले. यावेळी अ‍ॅड. कैलास मोरे, अनंत गायकवाड, ज्योती क्षीरसागर, छाया गवई, वैशाली बोखरे, नंदा कांबळे, संतोष जाधव, प्रकाश सोनवणे, राजेंद्र बावस्कर, सुनील गायकवाड, प्रदीप ढोले, मुकुंद सोनवणे, जनार्दन कांबळे, संजय शिंदे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भरत देसाई व संतोष सोनवणे यांनी केले. यावेळी उल्हास जाधव, श्याम जाधव, सचिन सरोते, योगेश गायकवाड, किशोर कामत, हिराताई हिरे, प्राजक्ता देसाई आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सायबर गुन्ह्यांपासून सावध राहा

## वावोशी विद्यालयात पोलिसांकडून सायबर जनजागृती

**। वावोशी । प्रतिनिधी ।**

सायबर गुन्ह्यांपासून स्वत:चे आणि समाजाचे संरक्षण करण्यासाठी जनजागृती होणे अत्यावश्यक आहे. याच उद्देशाने सायबर मास निमित्त वावोशी येथील श्री छत्रपती विद्यालय व ज्युनियर कॉलेज, वावोशी येथे १८ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:०० ते ११:०० या वेळेत विद्यार्थ्यांसाठी सायबर जनजागृती



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात वावोशी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक संतोष आवटी व त्यांचा स्टाफ उपस्थित होता. त्यांनी १२ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांना ''सायबर गुन्हे आणि त्यापासून घ्यावयाची काळजी'' या विषयावर दृकश्राव्य माध्यमातून (प्रोजेक्टरद्वारे) सविस्तर मार्गदर्शन केले. सायबर फसवणूक, सोशल मीडियावरील जबाबदारीपूर्वक वापर, ऑनलाइन व्यवहारातील सावधगिरी आणि वैयक्तीक माहितीची गोपनीयता यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण माहिती देण्यात आली.

या सत्राला विद्यालयातील सुमारे ५० ते ६० विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या जनजागृती उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



# पोलिसांवर शुभेच्छांचा वर्षाव

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस अधिकारी संदिप कहाळे यांच्या वाढदिवसानिमित्त आणि दिवाळीनिमित्त म्हसळा तालुका सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, नागरिक, मित्रपरिवार आणि शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी पोलीस ठाणे कार्यालयात तसेच सोशल मीडियावर अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

पान १ वरून

## कामोठ्यात मायलेकीचा मृत्यू

सेक्टर ३६ मधील आंबे श्रद्धा रहिवासी संस्थेतील तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक ३०१ आणि चौथ्या मजल्यावरील ४०१ क्रमांकाच्या फ्लॅटमध्ये आग लागली असल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली. माहिती मिळताच घटनास्थळी पोहोचलेल्या पनवेल पालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवले यावेळी केलेल्या पाहणीत फ्लॅट क्रमांक ३०१ मध्ये असलेल्या तीन सिलिंडर्सपैकी दोन सिलिंडर्सचा स्फोट झाल्याचे अग्निशमन दलाच्या जवानांच्या लक्षात आले. अग्निशमन दलाच्या प्राथमिक तपासानुसार, घरातील दोन गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याने ही आग लागली. या स्फोटामुळे दुसऱ्या मजल्यावरील संपूर्ण घर उद्ध्वस्त झाले. आग इतक्या वेगाने पसरली की, काही क्षणांतच घर धुराने आणि ज्वालांनी वेढले गेले. घरात त्यावेळी तीन सदस्य होते. त्यापैकी दोघांनी तात्काळ बाहेर पडून आपले प्राण वाचवले. मात्र, आई आणि मुलगी आतमध्ये अडकल्या. अग्निशमन दलाने जीव धोक्यात घालून त्यांना वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले; पण धूर आणि उष्णतेमुळे आत प्रवेश करणे अवघड ठरत होते. दरम्यान, रेखा शिसोदिया व पायल शिसोदिया यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शेवटी आग आटोक्यात आल्यानंतर दोघींचा होरपळलेला मृतदेह मिळाला.

**दिवाळीच्या आनंदावर काळोख**

ही दुर्घटना घडली त्यावेळी परिसरात दिवाळी सणाचा उत्साह होता. घराघरांत दिवे, फटाके आणि आनंदाचे वातावरण होते. परंतु, अचानक झालेल्या या भीषण घटनेने कामोठे परिसरात शोककळा पसरली. नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंदाऐवजी भीती आणि हळहळ स्पष्ट दिसत होती. स्थानिकांनी सांगितले की, आग लागल्याचे लक्षात येताच आम्ही धावत बाहेर आलो. काही क्षणातच संपूर्ण मजला धुराने भरला होता. अग्निशमन दल आले नसते, तर कदाचित संपूर्ण इमारत जळाली असती.

**अग्निशमन दलाचा अहवाल आणि पुढील तपास**

अग्निशमन दलाने आग विझवून घरातील पाहणी केली आहे. प्राथमिक अहवालानुसार, सिलिंडर लिकेज आणि स्पार्कमुळे स्फोट झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, नेमके कारण समजण्यासाठी तांत्रिक तपास सुरू आहे. कामोठे पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, त्यांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवले आहेत. मृतांची ओळख पटली असून, दोघी आई–मुलगी असल्याची पुष्टी पोलिसांनी केली आहे.

## वाशीतील अग्नितांडवात चौघांचा मृत्यू

याशिवाय, रहेजा रेसिडन्सीला लागलेल्या आगीमध्ये आणखी एका व्यक्तीचा मृत्यू झाला. ८४ वर्षांच्या कमला हिरल जैन यांना आगीत आपला जीव गमवावा लागला. कमला जैन या आजारी असल्यामुळे बिछान्यालाच खिळून होत्या. त्यामुळे आग लागल्यानंतर त्यांच्या घरातील इतर सदस्य बाहेर पडले. मात्र, कमल जैन यांना उठून बाहेर जाता आले नाही. अग्निशमन दल याठिकाणी आल्यानंतर त्यांनी बचावकार्याला सुरुवात केली. अग्निशमन दलाचे जवान इमारतीच्या आत दाखल होऊन दहाव्या मजल्यापर्यंत पोहोचले होते. मात्र, याठिकाणी प्रचंड धूर पसरल्याने कमला जैन यांना लगेच बाहेर काढता आले नाही. त्यामुळे कमला जैन यांचा आगीत होरपळून आणि धुराने गुदमरुन जागेवरच मृत्यू झाला.

**वाशीत नेमकं काय घडलं?**

सोमवारी मध्यरात्री १२.४० च्या सुमारास रहेजा रेसिडेन्सीमध्ये दहाव्या मजल्यावर ही आग लागली. त्यानंतर ही आग वेगाने पसरत गेली आणि ११व्या आणि १२ व्या मजल्याला आगीने कवेत घेतले. या आगीने भीषण स्वरुप धारण केल्याने वाशी, नेरुळ, ऐरोली आणि कोपरखैरणे येथील अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाचे तब्बल ४० जवान ही आग विझविण्यासाठी आणि बचावकार्यात सहभागी झाले होते. या दुर्घटनेत जवळपास १४ जण जखमीही झाले. या सर्वांना हिरानंदानी आणि एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

## लाडक्या भावांचा सरकारला चुना

त्याचसोबत ७७ हजार ९८० महिलांनाही अपात्र ठरवण्यात आले ज्यांनी चुकीच्या पद्धतीने या योजनेचा लाभ घेतला होता. सरकारला १६४ कोटींचा चुना या १२ हजार पुरुषांनी १३ महिने या योजनेचा लाभ घेतला. या पुरुषांनी दर महिना १५०० रूपये घेतले तर ७७ हजार अपात्र महिलांना १२ महिन्यापर्यंत ही रक्कम मिळाली. त्यामुळे सरकारचे एकूण १६४.५२ कोटी रूपये रक्कम चुकीच्या खात्यात वर्ग झाली. ज्यातून २५ कोटी पुरुषांनी तर १४० कोटी अपात्र महिलांनी लाभ घेतला.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या ४ महिने आधी ही योजना सुरू करण्यात आली होती. ऑगस्ट २०२४ मध्ये लाडकी बहीण योजना प्रचार आणि प्रसार करण्यासाठी २०० कोटी बजेट घोषित केले होते. विरोधकांनी या योजनेवरून तत्कालीन सत्ताधाऱ्यांवर टीकास्त्र सोडले होते. सध्याच्या घडीला २.४१ कोटी महिला या योजनेचा लाभ घेत आहेत. ज्यातून सरकारी तिजोरीवर ३४०० कोटींचा आर्थिक भार पडत आहे. या योजनेतील निकषांना डावलून २४०० सरकारी कर्मचाऱ्यांनी योजनेचा चुकीचा लाभ घेतला. ज्यात पुरुषही सहभागी आहेत. सरकारने अद्याप अपात्र लाभार्थ्यांकडून कुठलीही वसुली केली नाही, ना त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे. सुरुवातीच्या तपासात २६ लाख लाभार्थी महिला अपात्र ठरल्या. आतापर्यंत २६.३४ लाख संशयित खाते योजनेच्या यादीतून वगळण्यात आले आहेत. जसजसं पडताळणी होत जाईल, तसं हा आकडा वाढण्याची शक्यता आहे, असं अधिकाऱ्यांनी सांगितले.

पुरुष लाभार्थ्यांनी जुलै २०२४ ते जुलै २०२५ या काळात लाडकी बहीण योजनेचे पैसे घेतले. जुलै २०२५ नंतर ही रक्कम बंद करण्यात आली. परंतु, या पुरुष लाभार्थ्यांकडून सरकारने वसुली केली नाही. ज्या कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न २.५० लाखांहून अधिक होते किंवा एका कुटुंबात दोन किंवा त्याहून अधिक सदस्यांनी योजनेचा लाभ घेतला, अशा ७७ हजार महिलांना योजनेतून अपात्र ठरवण्यात आले. लाडकी बहीण योजनेतील घोटाळा रोखण्यासाठी राज्यव्यापी ई–केवायसी मोहीम सुरू केली आहे. सर्व लाभार्थ्यांना ई–केवायसी बंधनकारक असल्याने आणखी प्रकार समोर येण्याची शक्यता आहे.

## पोलीस अधिकारी रडारवर

त्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आली होती. याप्रकरणी यूएसएच्या सुरक्षा यंत्रणेने माहिती घेऊन त्यांचे आयपी नंबर शोधून काढले. यामध्ये रायगड जिल्ह्यातील तत्कालीन पोलीस वरिष्ठ पोलीस अधिकारी व विद्यमान पोलीस निरीक्षकांचा समावेश असल्याची माहिती उघड झाली आहे. फेक कॉल सेंटरला चालविण्यास अर्थपूर्ण पाठबळ असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. या प्रकरणाला दुजोरा देणाऱ्या अधिकाऱ्यांची लवकरच तपासणी केली जाणार आहे. सीबीआयच्या माध्यमातून त्यांनी चौकशी केली जाणार असल्याची चर्चा सध्या पोलीस दलात सुरु आहे. त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह पोलीस निरीक्षक सीबीआयच्या रडारवर आहेत. लवकरच त्यांना नोटीसा बजावल्या जाणार असल्याची चर्चा आहे.

## ऐन दिवाळीत आनंदावर पाणी

तर हाताला दाणा मिळणार नाही. याच विचारांतून भात कापणी सुरु केली आहे.दिवाळी सणाच्या अगोदरपासून बहुतांशी ठिकाणी भात कापणी सुरुवात झाली आहे. दिवसा प्रखर उष्णता आणि सायंकाळी पावसाचे आगमन यामुळे बळीराजा पुरता हैराण झाला आहे. पावसाने बळीराजा मोठ्या संकटात सापडला आहे.

मंगळवारी(दि.२१) सायंकाळी पावसाने जोरदार सुरुवात केली अलिबागसह अनेक भागात पाऊस जोरात सुरु झाला. अचानक पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची धावपळ उडाली. कापणी करून उडवी रचलेल्या भातपीकांवर प्लास्टीकचे आवरण लावण्यासाठी धावाधाव सुरु झाली. तर कापणी केलेले भात पाण्याखाली गेल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. हातातोंडाशी आलेला घास जाण्याची भिती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

जिल्ह्यामध्ये मंगळवारी सायंकाळी अनेक भागात पाऊस पडला आहे. येलो अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहवे, असे आवाहन करण्यात येत आहे, असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी सांगितले.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फटाके, आकाश कंदीलची दुकाने उभी केली आहेत. दोन दिवसांपासून खरेदीला सुरुवात झाली. मात्र मंगळवारी सायंकाळी अचानक पडलेल्या पावसामुळे दुकानातील फटाके, आकाश कंदील भिजले. त्यामुळे मोठे नुकसान झाले आहे, असे फटाके व आकाश कंदील विक्रेते प्रकाश भांजी यांनी सांगितले.

## भूषणला कोणताही आजार नव्हता

तर चालूही शकला नसता! त्याला मारझोड करण्याचा अधिकार पोलिसांना कोणी दिला? कारण, ज्यावेळी भूषणला अलिबागच्या जिल्हा रुग्णालयात तपासणीसाठी आणले होते. तेव्हा मी त्याला भेटले. तेव्हा त्याच्या कमरेवर मारल्याचे लाल निशाण मला दिसले, असे पत्नीने सांगितले. तेव्हा त्याला विचारले असता, पोलिसांनी मला मारले असे भूषणनेच सांगितले, असे पत्नी म्हणाली.

पोलीस कोठडीत असताना भूषणची तब्येत बिघडल्याने त्याला पुन्हा जिल्हा रुग्णालयात आणले. परंतु, त्याला सीटीस्कॅन करण्यासाठी कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात हलविण्यात आले. कामोठे येथे नेण्यासाठी सरकारी रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याचे सांगत पोलिसांनी त्याला खासगी रुग्णवाहिकेतून कामोठेच्या एमजीएम रुग्णालयात दाखल केल्याचे भूषणच्या पत्नीने सांगितले. एमजीएम रुग्णालयात भूषणचे सीटीस्कॅन केल्यानंतर त्याच्या रिपोर्टमध्ये काहीच आढळून आले नाही, परंतु रुग्ण आरोपी असल्याने तेथील रुग्णालयाने त्याला उपचारासाठी मुंबईतील जे.जे. रुग्णालयात पाठविल्याचेही पत्नीने सांगितले. त्यामुळे डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे भूषणला जे.जे. रुग्णालयात हलविण्यात आले. सुरुवातीस त्याच्यावर जनरल वॉर्डमध्ये उपचार सुरू होते. तो उपचारास चांगला प्रतिसादही देत होता. परंतु, जे.जे.तील पहिल्या दिवसापासून माझ्यासह घरातील कोणाही व्यक्तीला पोलिसांनी भूषणला भेटू दिले नाही. त्याची विचारपूसही करु दिली नाही, असा आरोपही भूषणच्या पत्नीने केला आहे. माझा नवरा चांगला चालता–फिरता असताना, त्याला कोणताही आजार नसताना आधी फीट येतेय म्हणून उपचार सुरू आणि मृत्यू न्यूमोनियामुळे झाल्याचे सांगत डॉक्टरांचा अहवाल दाखवत पोलिसांनी या प्रकरणावर पडदा टाकून बंदोबस्त केलाय, असा आरोपही भूषणचा भाऊ मनोज आणि पत्नीने केला आहे.

**आरोप सिद्ध झाले का?**

संशयित आरोपी म्हणून भूषणला अटक करण्यात आली होती. पोलिसांनी जेव्हा कारवाई केली, तेव्हा मी आणि मुलगा घरात होतो, असे भूषणच्या पत्नीने सांगितले. पोलिसांनी जप्त केलेल्या नोटा घरात सापडलेल्या नाहीत, तसेच जे प्रिंटर या तपासादरम्यान जप्त केलेत, असे पोलीस सांगत आहेत, ते प्रिंटरही घरात मिळालेले नाही, असा दावाही भूषणच्या पत्नीने केला आहे. आरोप सिद्ध झाल्यानंतर न्यायालय जी काय शिक्षा द्यायची, देऊ दे. परंतु, कायदा हातात घेऊन मारणे कितपत योग्य आहे? आज माझा नवरा या जगात नाही. संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले आहे. मुलाच्या डोक्यावरील बापाचे छत्र हरपले असून, तो पोरका झाला आहे.

**तपास सीआयडीकडे**

भूषण पतंगे मृत्यूप्रकरणी आता सीआयडीमार्फत तपास सुरू करण्यात आला. अलिबागमधील जिल्हा कारागृह आणि अलिबाग पोलीस ठाणे येथे जाऊन संबंधित अधिकाऱ्यांशी तसेच तपासिक अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे.

## माजी आ. राजीव देशमुख यांचे निधन

यांची ओळख होती. राजीव देशमुख अचानक अस्वस्थ जाणवू लागल्यानं धुळे येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. परंतु रुग्णालयात उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. जळगाव जिल्ह्याच्या राजकारणात त्यांनी आपल्या नेतृत्वानं एक वेगळं स्थान निर्माण केलं. ते राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष होते, तसेच २००९ ते २०१४ या कार्यकाळात राजू देशमुख हे विधानसभेचे सदस्यदेखील होते.

# नवेदर बेली पुलाची अवस्था बिकट

■ प्रवेश बंदी असतानाही अवजड वाहनांची वाहतूक

■ दुरुस्तीकडे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नवेदर बेली येथील पूलाची अवस्था बिकट झाली आहे. हा पुल अखेरची घटका मोजत आहे. त्यामुळे या पुलावरून अवजड वाहनांच्या वाहतुकीवर तात्काळ बंदी घालणारा आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी ऑगस्ट महिन्यात जारी केला होता. मात्र, आजही त्या पुलावरून अवजड वाहनांची वाहतूक सुरुच आहे. त्यामुळे या पुलाच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप प्रवासी वर्गातून होत आहे.

विजना कन्सलटींग इंजिनिअरींग प्रा. लि. संस्थेमार्फत अलिबाग-रोहा, अलिबाग-रेवदंडा, पोयनाड-उसर-भादाणे व भाकरवड-देहेन या मार्गांवरील एकूण ८ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले होते. त्यामध्ये नवेदर बेली पुलाचादेखील समावेश आहे. हे पूल संरचनात्मकदृष्ट्या धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी संबंधित पुलांवरून अवजड वाहनांच्या वाहतुकीवर तात्काळ बंदी घालणारा आदेश ऑगस्ट महिन्यात जारी केला होता. त्यान नवेदर बेली पूल अधिक असुरक्षित झाल्याने वाहनचालकांनी व ट्रान्सपोर्ट संस्थांनी प्रशासनाच्या आदेशाचे काटेकोर पालन करावे. अपघात टाळण्यासाठी व जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही कार्यवाही करण्यात आली असल्याचे लेखी आदेश काढण्यात आले आहेत. पुढील आदेश मिळेपर्यंत बंदी लागू राहणार असून, नियमभंग करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळिवले होते. मात्र, बंदीचे आदेश झुगारून अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नवेदर बेली येथील पुलावरून अनेक अवजड वाहने धावताना दिसत आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करून होत असलेल्या खासगी अवजड वाहनांना रोखणार कधी, असा प्रश्न नागरिकांकडून केला जात आहे.

### बांधकाम विभागाकडून बघ्याची भूमिका

नवेदर बेली जवळील पुल अखेरची घटका मोजत आहे. या पुलाचा खालील भाग खचला असून सिमेंट निघालेले आहे. अनेक भागांना तडे गेले आहेत. पुलाच्या लोखंडी सळई देखील बाहेर निघाल्या आहेत. त्यांना गंज लागलेला आहे. त्यामुळे हा पुल अखेरची घटका मोजत असल्याचे चित्र आहे. या पुलाच्या दुरुस्तीकडे अद्यापपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून लक्ष देण्यात आले नाही. पाऊस संपून अनेक दिवस उलटून गेले आहेत. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या पुलाबाबत बघ्याची भूमिकाच घेतली जात आहे.

> धोकादायक पुलांची नव्याने उभारणी करण्यात येणार आहे. या कामाची निविदा काढण्यात आली असून लवकर त्याचे काम सुरू करण्यात येईल. याबाब अधिक माहिती उपअभियंता यांच्याकडे आहे.
>
> – मोनिका धायतडक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

# जीव मुठीत घेऊन प्रवास

■ फलाटांची उंची वाढविण्याची मागणी

■ दिल्लीतील रेल्वे बोर्डाला लेखी निवेदन



| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |

कोकण वासीयांना ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्यामुळे रोजगारासाठी शहरात जावे लागते. कोकणवासीय गणेशोत्सव, शिमगा, दिवाळी या सणासुदीला मोठ्या प्रमाणावर गावी येत असतात. त्यावेळी हा प्रवास ते कोकण रेल्वेच्या माध्यमातून करत असतात. कोकण रेल्वेचा प्रवास सुरक्षित आणि कमी खर्चिक आहे; मात्र, कोकण रेल्वेच्या मार्गावरील रेल्वे स्थानकांच्या फलाटांची उंची अतिशय कमी असल्यामुळे जीव मुठीत घेऊन चाकरमान्यांसह लहानमुलं, महिला, वयोवृद्ध व दिव्यांगांना उतरावे लागते. गेल्या ३० वर्षांपासून या मार्गावरील प्रवासी आपली व्यथा शासनदरबारी, तसेच रेल्वे बोर्डाकडे करीत आहेत. मात्र, त्यांच्या या मागणीला केराची टोपली दाखविण्यात आली आहे. या संदर्भात कोकण विकास समितीच्यावतीने २० नोव्हेंबर रोजी नवी दिल्ली येथील रेल्वे बोर्डाचे मुख कार्यकारी अधिकारी यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे.

# ऐन दिवाळीत व्यापारी हवालदिल

■ सुधागड तालुक्यात पावसाचे थैमान

■ शेकतकऱ्यांसह दुकांनदारांचे लाखोंचे नुकसान

| पाली/वाघोशी | पतिनिधी |

सुधागड तालुक्यात मंगळवारी (दि.२१) दुपारी दोन वाजल्यापासून पालीसह सुधागड तालुक्यात विविध ठिकाणी सोसाट्याचा वारा व विजांच्या कडकडाटासह आलेल्या परतीच्या मुसळधार पावसाने धुडगूस घातला. परिणामी ऐन दिवाळीत शेतकरयांसह व्यापारी हवालदिल तर, शेतकरी हताश झाले आहेत.

मंगळवारी झालेल्या पावसामुळे सुधागड तालुक्यात वीज पुरवठा देखील खंडित झाला होता. दिवाळीच्या खरेदीसाठी बाहेर पडलेले ग्राहक पावसामुळे माघारी फिरले. शेतकऱ्यांच्या भाताचे पिक अजुनही शेतात आहे. तर, काहींनी कापून ठेवले आहेत. पावसामुळे पिकांचे नुकसान झाले. व्यापारी व दुकानदारांनी दिवाळीचा लाखो रुपयांचा माल भरून ठेवला आहे. परंतु, पावसामुळे ग्राहक खरेदीसाठी बाहेर न पडल्याने ऐन दिवाळीत वस्तुंना उठाव मळिणार नाही. फटाके विक्रेत्यांचा माल अक्षरशः भिजला आहे. इलेक्ट्रिक सामान, आकाश कंदील व दिवे देखील भिजले आहेत. त्यामुळे व्यावसायिक व व्यापारी पुरते हवालदिल झाले आहेत. असे पालीतील व्यावसायिक मुकुंद कोसुंबकर यांनी सांगितले.



● रायगड पोलीस दलाच्यावतीने मंगळवारी (दि.२१) पोलीस परेड मैदानावर हवेत फैरी झाडून पोलीस जवानांना अभिवादन करण्यात आले. (छायाचित्रः समीर मालोदे)

# निवासी संकुलात अनधिकृत गोडाऊन

## ग्रामपंचायतीची कारवाईची नोटीस

| रसायनी | प्रतिनिधी |

मोहोपाडा येथील महादेव इलेक्ट्रॉनीक्सचे अशोक कुमावत यांनी रिस येथील रिलायन्स को-ऑपरेटिव्ह रो हाऊसिंग सोसायटीतील त्यांच्या मालकीच्या निवासी संकुलात अनधिकृतपणे गोडाऊन थाटले आहे. या गोडाऊनमध्ये जुने आणि नवीन इलेक्ट्रॉनिक्स व इलेक्ट्रिक सामान ठेवल्यामुळे निवासी संकुलाचा व्यावसायिक वापर होत असून, यामुळे सोसायटीतील रहिवाशांना धोका निर्माण होण्याची भीती सोसायटीच्या सदस्यांनी व्यक्त केली आहे. या गंभीर प्रकाराबाबत सोसायटीतील सर्व रहिवाशांनी एकत्र येत कुमावत यांच्याविरोधात वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीची दखल घेऊन ग्रामपंचायतीने कुमावत यांना निवासी संकुलाचा व्यावसायिक कामासाठी वापर थांबवून, रो हाऊसमधील सर्व सामान तात्काळ खाली करण्याचे निर्देश दिले आहेत. जर त्यांनी या सूचनेचे पालन केले नाही, तर ग्रामपंचायत कायदेशीर कारवाई करेल, अशी लेखी सूचना कुमावत यांना पत्राद्वारे पाठवण्यात आली आहे.

# जागामालकांकडून झाडांची कत्तल

■ अनधिकृत गाळे बांधण्याचा प्रयत्न

■ निसर्गरम्य श्रीवर्धन काँक्रिटच्या जंगलात हरवण्याची पर्यावरणप्रेमींना भीती



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन शहरातील पेशवे आळी ते बाजारपेठ असा जोडणारा पूर्वी कोपरी मार्ग होता. या मार्गावरून पावसाळी पाणी वाहते. त्यामुळे पावसाळ्यात या मार्गाला नाल्याचे स्वरूप येते. चार ते पाच वर्षांपूर्वी श्रीवर्धन नगर परिषदेने या नाल्यावर पूर्णपणे काँक्रीटचा रस्ता तयार केला. हा मार्ग तयार झाल्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील जागामालकांना रान मोकळे मिळाले आहे. अनेकांनी या काँक्रीट मार्गाच्या बाजूला आपली अनधिकृत बांधकामे उभी करून गाळे बांधून ते भाड्याने दिले आहेत. परंतु, त्यासाठी जागा मालकांनी आपल्या जागेतील विविध जातींचे वृक्ष, नारळ, सुपारीची रोपे एका रात्रीत कत्तल करून त्या ठिकाणी सपाट मैदान तयार केले आहे. दिवाळीनिमित्त लागोपाठ आलेल्या सुट्ट्यांचा फायदा घेऊन हे काम करण्यात आल्याचे बोलले जात आहे. काही दिवसानंतर त्या ठिकाणी देखील मोठ्या प्रमाणावरती इमारती उभ्या राहतील. त्यामुळे निसर्गरम्य असलेले श्रीवर्धन शहर काँक्रिटच्या जंगलात हरवून जाईल, असे पर्यावरणप्रेमींकडून बोलले जात आहे. तरी श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाने संबंधित जागा मालकांवर झाडांची कत्तल केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करावा. तसेच, त्या ठिकाणी एखादा विकासक इमारती उभ्या करण्यासाठी परवानगी मागत असल्यास ती देऊ नये, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# अवधूत वारगेचा दिल्लीत डंका




| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या ९४ व्या जयंतीनिमित्त नवी दिल्ली येथे राष्ट्रीय अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात विविध विषयांवर स्पर्धा घेण्यात आली. त्यात कर्जत येथील युनिव्हर्सल ए.आय. युनिव्हर्सिटीतील द्वितीय वर्षातील विद्यार्थी अवधूत वारगे हा प्रमुख आकर्षण ठरला आहे. त्याने अंतिम २०मध्ये यश मिळवले असून रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. नवी दिल्ली येथे 'कलाम व्हिजन नॅशनल स्टेड अँड क्विझ कॉनक्लेव्ह २०२५' या राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात देशातील विविध राज्यातील २२० हून अधीक शाळा व महाविद्यालयांतील सुमारे ४१५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचाही ऑनलाईन सहभाग दिसून आला. या अधिवेशनामध्ये विद्यार्थ्यांनी, नॅनोटेक्नॉलॉजी, रीयूजेबल एरोस्पेस व्हेइकल्स, भविष्यातील ऊर्जा, रिमोट सेन्सिंग, आपत्ती व्यवस्थापन आणि संचार नेटवर्क्स या विषयांवर आधारित नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले.




# शेतकऱ्यांची दिवाळी शेतात

## भातकापणीसह झोडणीच्या कामांची लगबग



| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा भाताचे कोठार म्हणून ओळखला जातो. सध्या रायगड जिल्ह्यामध्ये भात पिके आता डोलू लागली आहेत. त्यामुळे आता जिल्ह्यात भातकापणीच्या कामांना वेग आला आहे. दिवाळी असली तरी परतीच्या पावसाची भीती व मजुरांची कमतरता यामुळे धान्य आपल्या कणगीत पडावे यासाठी भात कापणी व झोडणीच्या कामांची लगबग सुरू झाली आहे. परिणामी शेतकऱ्यांना दिवाळीच्या आनंदाला मुकावे लागताना दिसत आहे.

सध्या शेतीकामासाठी मजुरांची कमतरता भासत असल्याने ऐन दिवाळीत शेतकरी कुटुंबातील सर्व सदस्य कापणी, झोडणीसह बांधणीच्या कामाला लागली आहेत. परतीचा पाऊस व अतिवृष्टीचा फटका भातशेतीला बसू नये म्हणून शेतकरी मिळेल ते मनुष्यबळ वापरून दिवाळीतच कापणीची कामे आटपून घेत आहेत. ग्रामीण भागात आजही मोकळ्या आकाशात खळ्यांवर झोडणीची कामे होत आहेत. लवकरात लवकर खळ्यांमध्ये पडलेला भात पोत्यात भरून घरात आणून टाकण्याचे काम सुरू आहे. अनेक ठिकाणी कापणी व काढणीच्या कामाला वेळेत मजूर मिळत नसल्याने सधन शेतकरी यंत्राच्या वापराने कामे जलदगतीने आटपून घेत आहेत. काही शेतकरी पारंपरिक पद्धतीला बाजूला सारत यंत्रसामुग्रीचा वापर करीत आहेत. यामध्ये श्रम वेळ व पैसा बचत होत आहे.






## स्वदेशीचे काय झाले?

डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेत स्वदेशीची भाषा सुरु केली आणि मोदी आणि मंडळींना पुन्हा एकवार स्वदेशीची आठवण झाली. गर्व से कहो मैं स्वदेशी हूँ असे नागरिकांनी म्हणावे असे दोन्ही देशातील नेत्यांना वाटते. त्यासाठी ट्रम्प यांनी गेल्या ८० वर्षांच्या भरभराटीसाठी अमेरिकेने जी गाडी चालवली तिची चाके उलटी करण्याचा प्रयत्न चालवला आहे. जिथे स्वस्त पडेल तिथे तिथे त्या वस्तूंचे उत्पादन करायचे आणि जगभर विकायचे ही अमेरिकी कंपन्यांची रणनीती होती. या कंपन्यांची मालकी अमेरिकी लोकांच्याच हातात राहील व सगळा फायदा अमेरिकेत पाठवला जाईल अशी ही व्यवस्था होती. यात अमेरिका पैशांनी श्रीमंत झाली, पण अमेरिकेतले रोजगार संपले. शिवाय, अमेरिका म्हणजे अमेरिकेतले काही मूठभर लोकच श्रीमंत झाले. तेच लोकांना जाचते आहे. त्यासाठीच ट्रम्प यांची मेक अमेरिका ग्रेट अगेन म्हणजे अमेरिकेला पुन्हा महान करुया अशी मोहिम आहे. चीन, भारत, व्हिएतनाम इत्यादी ठिकाणी होणारे मोबाईल, मोटारी, कपडे, चपला, दागिने, टूथब्रश, साबण सर्व काही अमेरिकेत झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. इकडे मोदी आणि भाजपवाले ब्रिटीश, मुस्लिमांपूर्वीच्या तथाकथित महान भारताच्या शोधात आहेत. गंमत अशी की, मेरा भारत महान ही घोषणा पहिल्यांदा काँग्रेसच्या काळात दिली गेली. याच काँग्रेसचे दोन आद्य गुरु लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांनी स्वदेशी वस्तूंच्या वापरासाठी मोठी आंदोलने केली. टिळकांच्या काळात परदेशी वस्तूंच्या होळ्या झाल्या होत्या. म्हणजे भाजप असो वा काँग्रेस अशा दोन्हींच्या मतदारांना स्वदेशीच्या घोषणा नवीन नाहीत. पण तरीही स्वदेशीचा प्रचार इथे सोपा राहिलेला नाही. गेल्या ८० वर्षांमध्ये जगाची इतकी सरमिसळ झाली आहे की, गोमूत्र किंवा शेण विकायचे म्हटले तर ते देणारी शुध्द भारतीय वंशाची गायही मिळणे कठीण आहे. ते जरसी गायींचे असण्याचीच शक्यता अधिक आहे. एखादी भारतात तयार होणारी वस्तू असली तरी तिचा संबंध कोणत्या देशाशी असेल हे सांगता येणे कठीण आहे.

### मोदीभक्तांनी बहिष्कार घातला का?

नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात स्वदेशीचा नारा दिला. दुकानदारांनी आपल्या दुकानांवर आमच्या येथे स्वदेशीच वस्तू विकल्या जातात अशा पाट्या लावण्याचे आवाहन त्यांनी केले. भाजप हा जगातला सर्वात मोठा पक्ष आहे. देशातले कोट्यवधी लोक मोदींचे भक्त आहेत. संघाचे मोहन भागवतही गेली अनेक वर्षे अधूनमधून आठवण झालीत की स्वदेशी वापरा अशी हळी देतात. देशात ७० हजार संघाच्या शाखा आहेत. त्या शाखांशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रत्येकी किमान १०० लोक संबंधित आहेत असे गृहित धरले तरी सत्तर लाख लोकांनी भागवतांचे ऐकायला हवे. मोदींचे कोट्यवधी भक्त अधिक हे संघवाले यांनी मिळून समजा फक्त स्वदेशीच वापरायचे ठरवले तर एका रात्रीत क्रांती होईल. परदेशी कंपन्यांची पळापळ होईल. पण अशी क्रांती वा पळापळ सोडाच, साधे झाडाचे पानही हललेले नाही. अमेझॉन या परकी कंपनीच्या दिवाळी सेलला सालाबादप्रमाणे प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यात चिनी बनावटीचे मोबाईल, लॅपटॉप, बूट, कपडे, चॉकलेट्स, चीज इत्यादी भरपूर विकले गेले. यावर कोठे कोणी बहिष्कार घातला अशी चुकार बातमीसुध्दा आली नाही. दुसरीकडे मुंबईत आणि इतरत्र भुयारी मार्ग, भुयारी रेल्वे उर्फ मेट्रो इत्यादींची कामेही जोरात सुरू आहेत. यासाठी भुयारे खणणारी जी यंत्रे येतात ती केवळ आणि केवळ चिनी बनावटीची असतात. मेट्रोसाठी येणारे बाकीचे सामान किंवा आपले सौर व पवनउर्जा प्रकल्पासाठीचे सामान हे सर्व चीनमधूनच येते. ते रोखण्याचा कोठेही प्रयत्न झालेला नाही. काही ठिकाणी, आमच्याकडे दिवाळीच्या दिव्यांच्या माळा, आकाशकंदील किंवा फटाके चायनीज नाहीत असे दुकानदार सांगताना दिसतात. पण त्यातही शुध्द भारतीय माल किती आहे याबाबत शंकाच आहे. म्हणजे समजा फटाके आपल्या शिवकाशीमध्ये तयार झाले असले तरी त्यातली दारु कदाचित चिनी असण्याची शक्यता असते. तेच कंदिलात वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचे व दिव्यांचे. आपल्या दुचाकी आणि चारचाकी गाड्यांमधला इलेक्ट्रॉनिक मालमसाला हा चिनी मालाशिवाय तयार होऊच शकत नाही अशी स्थिती आहे.

### चीनचा कबजा

पूर्वी टूथपेस्ट, साबण किंवा दाढीचे सामान किंवा चॉकलेट, बिस्किट्स, शीतपेये परदेशाहून येत असे. नंतर युनिलिव्हर, कॅडबरी किंवा कोका कोलासारख्या कंपन्या ते भारतातच तयार करू लागल्या. तरीही त्यांचा नफा युरोप वा अमेरिकेतच जात असतो. त्यामुळे शुद्ध विचार केला तर त्यांनाही देशी म्हणणे कठीण आहे. खुद्द नरेंद्र मोदींसारखे नेते लोकांना स्वदेशीचा उपदेश करून स्वतः मात्र गाडीपासून चष्म्यापर्यंत सर्व गोष्टी परदेशी वापरत असतात असा आरोप होतो. जी गोष्ट मोदींची आहे तीच तुमची आमचीही आहे. शुध्द स्वदेशीचे सोवळे पाळणे आपल्यालाही शक्य होणारे नाही. तांदूळ, गहू, भाज्या, चिकन, मटण हे आपण आपले तयार करतो. पण रोजच्या आहारातील डाळी आणि खाद्यतेले ही मात्र आपल्याला आयातच करावी लागतात. कारण पुरेशा प्रमाणात त्यांचे येथे उत्पादन होत नाही. याखेरीज रोजच्या वापरातले विविध प्रकारचे रबर व प्लास्टिकही अनेकदा आयात केलेले असते. औषध उत्पादनाच्या बाबतीत आपल्या कंपन्या पुढे आहेत. पण या औषधांसाठी जी रसायने वा कच्चा माल लागतो तो सगळा चीनमधून येतो. थोडक्यात आजच्या काळात शुद्ध स्वदेशी असे काही असू शकत नाही. यातल्या अनेक गोष्टी इथे तयार करणे अशक्य नसते. पण ते परवडणारे नसते. औषधांचा कच्चा माल म्हणजे रसायने आपणही बनवू शकतो. रायगड जिल्ह्यात दिघीजवळ तशी एक औद्योगिक वसाहत करण्याचे नक्की झाले आहे. पण असे कारखाने प्रचंड प्रदूषण करतात. शिवाय हे उत्पादन करणे आपल्याला खर्चिक पडते. चीन सगळ्या जगाला पुरवता येईल इतक्या राक्षसी प्रमाणात त्याचे उत्पादन करतो. त्यामुळे त्याला त्याच्या किमती स्वस्त ठेवता येतात. आपल्याला ते करणे सोपे जाणार नाही. हेच इतर अनेक बाबतीत आहे. सौरउर्जेसाठी जे सोलर पत्रे वापरले जातात ते बहुतेकदा चीनमधूनच आयात करावे लागतात. तिकडेच बनवणे ते परवडते. गेल्या ७०-८० वर्षांमध्ये जगाची आर्थिक व्यवस्था याच पायावर उभी राहिली आहे. पूर्वी जपानी कंपन्या इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा गाड्या स्वस्तात बनवत. त्यामुळे अमेरिकेपासून सर्व देशांमध्ये त्यांचा बोलबाला होता. नंतर चिन्यांनी आणखी स्वस्ताई केली. सगळे बाजार ताब्यात घेतले. याला एका स्वातंत्र्यदिनाच्या भाषणातून शह देता येत नसतो. त्या भाषणानेएक दिवस मिडियात हेडलाईन्स येतात व प्रसिध्दी मिळते. पण नंतरच्या दिवाळीमध्ये ती घोषणा देणारे मोदी, भागवत आणि त्यांचे भक्त यांनाही त्यांची आठवण राहत नाही.

विचार

# दिवाळी पर्यावरणपूरक करायची तर..

***काही चांगले सांगायला गेले, की आमचेच सण दिसतात का, असा प्रश्न विचारला जातो. खरे तर स्वतःचे घर सुधारले, तर इतरांना सांगण्याचा अधिकार मिळतो. वस्तुतः सततची अतिवृष्टी, हिमस्खलन, वाढते तापमान, शीतलहरी हे जलवायू परिवर्तन आणि प्रदूषणाचे परिणाम आहेत, हे लक्षात घेता फटाके फोडण्यापेक्षाही अन्य कृतींमधून आनंद मिळवता येतो. फक्त तशी इच्छाशक्ती असणे आवश्यक आहे, हे टिकाकारांना कधी समजणार?***



मिलिंद बेंडाळे

दिवाळी हा केवळ एक सण नाही, तर ती एक परंपरा आहे. ती घराघरात उजळणारी आशा आहे. एकत्र येणाऱ्या कुटुंबांची उब आहे आणि परंपरेच्या गाभ्यातून उमटणारा आनंदाचा प्रकाश आहे; पण गेल्या काही वर्षांमध्ये पर्यावरणपूरक दिवाळी ही संकल्पना चर्चेत आली आहे. पर्यावरणपूरक दिवाळी म्हणजे दिवाळीला फटाके वाजवायचे नाहीत, असे म्हटले जाते. पण तसे म्हटल्यास हा हिंदूंना पाजला जाणारा डोस आहे, की समाजाची गरज आहे, हे समजून घेतले पाहिजे. प्रदूषणाचा त्रास सर्वांनाच होत असतो. दिवाळीनंतर कर्णबधिरत्वाचे वाढलेले प्रमाण, दम्याच्या विकारात झालेली वाढ, हृदयविकाराच्या रुग्णांत झालेली वाढ आदी बाबी पाहिल्या, तर सण कुणाचाही असो, त्यात फटाके फोडून विषारी वायूचे प्रमाण वाढवणे हा मोठा प्रमाद असतो. आपल्याकडे लहानमोठ्यांना फटाके फोडायला खूप आवडतात. त्यामुळे पर्यावरणाच्या नावाखाली फटाक्यांवर बंदीची मागणी होते, तेव्हा काहींना तो परंपरेवर आघात वाटतो. खरे पाहता, पर्यावरणाची आठवण फक्त दिवाळीच्या वेळीच केली आणि इतर सणांबाबत मौन पाळले गेले, तर तो डोस वाटतो. विश्वचषकातील विजय असो, की नववर्षाचे स्वागत; फटाक्यांमुळे प्रदूषण होतच असते. त्यामुळे विरोध हा सर्वच वेळी करायला हवा. अगदी विवाह समारंभाच्या किंवा निवडणुकीतील विजयाच्या वेळीही तो करायला हवा. दिवाळीत ते जास्त फोडले जातात. त्यामुळे त्याची जास्त चर्चा होते इतकेच. आपला आनंद इतरांच्या दुखात भर घालत असेल, तर त्याला आनंद म्हणता येत नाही, तर विकृती म्हणावी लागते. हिंदूंच्या बाबतीतच नव्हे, तर अगदी मुस्लिम, जैन, ख्रिश्चन. शीख, बौद्ध आदी कुठलाही समाजघटक असला, तरी त्याने अल्पकालीन आनंदात सुख मानायचे, की दीर्घकालीन संकट ओढवून घ्यायचे, याचा तारतम्याने विचार करायला हवा.

'फटाके फोडू नका', 'ते करू नका,' अशा स्वरूपात सांगितले गेले, तर लोकांना विरोध करावासा वाटतो. संवादाऐवजी आदेश दिले जातात. काहीजण दिवाळीच्या आनंदाला मर्यादा घालण्याचा प्रयत्न म्हणून पाहतात. विशेषतः हिंदू सण म्हणजे प्रदूषण असा एकांगी संदेश दिला जातो. प्रदूषण सणाशी जोडण्याऐवजी फटाक्याशी जोडले, तर लोक ऐकतील. फटाक्यासाठी मुले आग्रही असतात, ही पळवाट झाली. लहान मुले लहान फटाके फोडतात. ध्वनी आणि वायूप्रदूषण करणारे फटाके मोठी माणसेच जास्त फोडतात, ही वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे. त्यातही गेल्या काही वर्षांपासून फटाक्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत शाळा, महाविद्यालयांमधून जागृती केली जात असली, तरी पालक आणि तरुणांचे प्रबोधन कोण करणार, हा खरा प्रश्न आहे. आपण पर्यावरणाचाही विचार केला पाहिजे. दिवाळीच्या काळात वायू आणि ध्वनी प्रदूषण प्रचंड प्रमाणात वाढते. वृद्ध, लहान मुले, आणि प्राणी यांना फटाक्यांमुळे त्रास होतो. अस्थमा, हृदयविकार आणि मानसिक अस्वस्थता वाढते. हे आरोग्याच्या दृष्टिकोनातून गंभीर आहे. पर्यावरणपूरक सण म्हणजे केवळ त्याग नव्हे, तर सर्जनशीलता, समजूतदारपणा आणि दीर्घकालीन विचार. मुलांना पर्यावरणाची जाणीव देणे ही त्यांच्या भविष्यासाठी गुंतवणूक आहे. सण काळानुसार बदलतात. परंपरा जपली जाते; मात्र काळाची छापही त्यावर पडते. पूर्वी तेलाचे दिवे होते, आता विजेचे दिवे आहेत. पूर्वी पत्रीच्या ताटात फराळ होता, आता बायोडिग्रेडेबल पॅकिंग आहे. म्हणजेच, परंपरेत बदल शक्य आहे; पण हा बदल बळजबरीने नव्हे तर आदराने आणि समजूतदारपणाने केला गेला पाहिजे.

आपल्या परंपरेचा आदर राखत, तिचा अर्थ नव्याने समजून घेण्याची ही संधी आहे. फटाक्यांऐवजी फुलबाज्या, प्लास्टिकऐवजी मातीचे दिवे आणि गोंगाटाऐवजी संगीत हे बदल शक्य आहेत. फटाके लावले, तरी कमी प्रमाणात आणि कमी प्रदूषणाचे फटाके लावता येतील; मात्र मुस्लिम, ख्रिश्चन अशा सर्व धर्मांमधील सणांच्या साजरीकरणातही पर्यावरणाची जाणीव असावी. तेव्हा ही चळवळ एकांगी वाटणार नाही; मात्र बरेचदा हिंदू सणांच्या बाबतीतच डोस पाजण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे लोक नाराज होतात. पर्यावरणपूरक दिवाळी ही एक चळवळ आहे. आपले भविषय उज्ज्वल करण्यासाठी. परंपरेचा आदर राखत, काळाची गरज ओळखून आपण दिवाळी साजरी करूया अशी दिवाळी जिथे प्रकाश आहे; पण धूर नाही. जिथे आनंद आहे; पण त्रास नाही आणि जिथे परंपरा आहे; पण जबाबदारीही आहे. दिवाळीचा सण उत्साह, चैतन्य घेऊन येतो. फटाके न फोडता मजा करण्याचा विचार करणे कठीण असले, तरी आपण दिवाळी पर्यावरणपूरक पद्धतीने साजरी केली तर बरेच नुकसान टाळता येईल. फटाक्याच्या धुरामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते आणि या प्रदूषणाचा फटका आरोग्याला बसतो. दिवाळी हा दिव्यांचा सण आहे. परंपरेनुसार लोक सण साजरा करण्यासाठी दिवे, दिव्यांच्या माळा, आकाशकंदील लावतात; परंतु कालांतराने फटाके फोडण्याने इतर परंपरांवर प्रभुत्व मिळवले आहे. आवाजाची पातळी खूप जास्त झाली आहे आणि त्यामुळे अनेकांची गैरसोय तर होतेच; पण पर्यावरणालाही हानी पोहोचते.

दिवाळीसाठी हल्ली बाजारात मातीसोबतच वेगवेगळ्या प्रकारचे दिवे पहायला मिळतात; मात्र प्लास्टिक किंवा इतर मटेरियलऐवजी मातीचे दिवेच लावायला हवेत. बाजारात विविध आकार, डिझाईन आणि पॅटर्नचे मातीचे दिवे मिळतात. साध्या पणत्यांसोबतच लटकणारे, मोठे स्टँडवाले दिवे घेता येतात. रांगोळी हा दिवाळीच्या सजावटीचा अविभाज्य भाग असतो. रांगोळी काढण्यासाठी हानिकारक रसायने असलेल्या रंगांऐवजी सेंद्रिय रंग का निवडू नयेत? रांगोळी डिझाइन करताना नैसर्गिक रंग वापरण्याचा प्रयत्न करायला हवा. रंगांऐवजी फुलांची रांगोळीही काढता येते. हे पर्यावरणाला अनुकूल आहे. दिवाळीमध्ये अनेक लोक मित्रांना, नातेवाईकांना ड्रायफ्रूट्स, चॉकलेट भेट देतात. बाजारात विविध प्रकारचे बॉक्स मिळतात. तुम्ही यासाठी ज्यूटचे बॅग किंवा पाउच किंवा बटवा वापरू शकता. हे फक्त दिसायला आकर्षक दिसणार नाही, तर त्या बॅगचा नंतरही वापर करता येईल. तसेच प्लास्टिक बॅगमुळे होणारे पर्यावरणाचे नुकसान टाळता येईल. दिवाळीत घर सजवण्यासाठी नेहमी विविध दुकानांमधून वस्तू खरेदी केल्या जातात; पण थोडी कल्पकता वापरुन घरात असलेल्या विविध रंगांच्या ओढण्या, जुन्या साड्यांचा वापर करुन उत्तम डेकोरेशन करता येते. याशिवाय झेंडू, गुलाबाची फुले, शेवंतीची फुले, आंब्याची पाने यांचा वापर करून घर सजवता येऊ शकते.

दिवाळीमध्ये अनेक लोक घरी पार्टी ठेवतात किंवा नातेवाईक, मित्रमंडळींकडे जाऊन दिवाळीच्या शुभेच्छा देतात. या वेळी अनेक लोक पाहुण्यांना डिस्पोजेबल प्लेट्स किंवा ग्लासमध्ये खाण्याचे पदार्थ वगैरे देतात. हे पर्यावरणासाठी चांगले नाही. त्याऐवजी बायोडिग्रेडेबल प्लेट्स आणि ग्लासेसची निवड करता येते. ती पर्यावरणासाठी अनुकूल आहेच, पण त्यांची विल्हेवाट लावणे सोपे असते. केळीच्या पानांच्या प्लेट्स, बांबूच्या प्लेट्स या सणाच्या मेजवानीसाठी उत्तम पर्याय ठरतात. आपल्याकडील सर्व सण-उत्सव निसर्गाशी नाते सांगणारे, जवळीक असणारे अशीच त्यांची पूर्वापार रचना आहे. मुळात माणूस हा उत्सवप्रिय प्राणी आहे. निसर्गात जगता जगता त्याने सृष्टीतील घटनाक्रमात होणारे बदल निरीक्षण करून हळूहळू ओळखले. सृष्टीतील इतर सजीवांप्रती सतत प्रेम, भूतदया, मैत्र जपण्याच्या शुद्ध हेतूने त्याने कृतज्ञतेपोटी खास त्यांच्या नावाने, सहभागाने सण-उत्सवाचे आयोजन केले. यातून स्वतःचा व समूहाचा आनंद द्विगुणित करण्याचा माणसाने नेहमीच प्रयत्न केला. या सर्व सण-उत्सवांना त्या त्या धर्माच्या, धार्मिक जाणिवांचा, परंपराचा पक्का आधार असतो, असे लक्षात येते. त्यामुळे सहजासहजी सण-उत्सवातील लहानसा बदलसुद्धा स्वीकारला जात नाही. मग त्यामागची तपासणी, चिकित्सा करणे ही तर फार लांबची गोष्ट ठरते. प्रत्येक धर्मातील चालीरिती, रितीरिवाज, प्रथा-परंपरा यामध्ये विविधता आढळते. एकूणच मानवी संस्कृती-उपसंस्कृती यातून घडत जाते, विकसित होत जाते. पुढे पुढे तिची जडणघडण होत राहते. काळ पुढे सरकतो तसे सृष्टीचे कोडे हळूहळू उलगडत जाते. त्याआधारे या सर्व सण उत्सवांच्या इष्ट-अनिष्टतेची चिकित्सा, पुनर्मांडणी करणे आवश्यक आहे.

# जिल्ह्यातील महिला सुरक्षित कधी होणार?

वैष्णवी वाडकर

देश कितीही सुशिक्षित झाला, कितीही नव-नवीन तंत्रज्ञान आले, तरी महिला सुरक्षेचा प्रश्न आजही तसाच कायम आहे. समाजात महिलांनी शिक्षण, रोजगार, राजकारण, क्रीडा, उद्योगधंदा या सर्वच क्षेत्रांत प्रगती केली आहे, तरीही पावला पावलांवर महिलांना असुरक्षिततेला सामोरे जावे लागते. भारतात महिला सक्षमीकरणात सावित्रीबाई फुले आणि ज्योतीबा फुले यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी भारतात स्त्री शिक्षणाचा पाया रचला व लाखो मुलींना सुशिक्षित केले. त्यांचा उद्देश केवळ शिक्षण देणे नव्हता, तर महिलांना समाजात स्वतंत्र ओळख आणि समान हक्क मिळवून देणे हा होता. आज शिक्षित महिला प्रत्येक क्षेत्रात यश प्राप्त करत असल्या तरी त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न सुटलेला नाही. सत्ताधिकाऱ्यांकडून याबाबत कोणतेही ठोस पाऊल उचलले जात नसल्यामुळेच महिला अत्याचारासारख्या घटना घडत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील महिला कधी सुरक्षित होतील, असा प्रश्न महिला वर्गासह सर्वसामान्यांमधून विचारला जात आहे.

हल्ली दररोज एक तरी महिला अत्याचाराची बातमी कानावर पडतेच. त्यात एखादीची रस्त्यावर छेड काढली जाते, लहान मुलींना जाळ्यात अडकवून त्यांचा विनयभंग केला जातो, ऑफिसमध्ये महिला कर्मचारीसोबत गैरवर्तणूक केली जाते, घरातील शुल्लक कारणावरून नवरा बायकोला मारहाण करतो, प्रेमसंबंधात प्रियसीचा खून केला जातो, तर कुठे महिलांना धमक्या देऊन त्यांचा मानसिक छळ केला जातो. आजची स्त्री सर्व क्षेत्रात कार्यरत असली तरी ती कुठेच सुरक्षित नसल्याचे चित्र संपुर्ण देशभर आहे. त्यामुळे महिला आणि असुरक्षितता हे एक समीकरणच झाल्याची चर्चा सर्वत्र होत आहे.

अशाच प्रकारच्या घटना रायगड जिल्ह्यात देखील घडत आहेत, त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात भीतीसह संतापाचे वातावरण पसरले आहे. जिल्ह्यात गेल्या दोन आठवड्यांत महिला अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याची दिसत आहे. त्यात अलिबागजवळील कनकेश्वर मंदिर परिसरात शुक्रवारी (दि.१०) संध्याकाळी सुरज बुरांडे याने आपल्या प्रेयसीवर लोखंडी हातोड्याने जीवघेणा हल्ला केला होता. प्रेयसी दुसऱ्या तरुणाशी बोलत असल्याचा संशय त्याच्या मनात आला आणि क्षणात त्याचा राग अनावर झाला. त्याने मंदिराच्या पायऱ्यांजवळ बसलेल्या प्रेयसीला हातोड्याने मारहाण करून, तिला तारेच्या जाळीत ओढून दगडानेही मारहाण केली. या हल्ल्यात पीडित तरुणी रक्तबंबाळ अवस्थेत असतानाही सुरज बुरांडे याने तिला तब्बल तीन तास त्याच अवस्थेत ठेवले होते. त्यानंतर पोलिसांनी सुरज बुरांडेला अटक केली आणि मुलीला जिल्हा रुग्णालयात दाखल केले. त्यामुळे अशा निर्जन ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून कोणत्याही प्रकारची उपाययोजना नसल्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे. अशा ठिकाणी पोलिसांचे पथक किंवा सुरक्षा रक्षकांची गस्त असणे गरजेचे आहे. यासाठी लोकनेत्यांनी आवाज उठवणे गरजेचे आहे. परंतु, त्यांच्याकडून देखील दुर्लक्ष होत असल्याची चर्चा होत आहे. दुसरी घटना मुरुड तालुक्यात घडली आहे. एका अल्पवयीन मुलीने विवाहित पुरुषाच्या सततच्या धमक्या आणि मानसिक छळाला कंटाळून आत्महत्या केली आहे. पीडित मुलगी ही स्थानिक महाविद्यालयात शिकत होती. मुलगी अल्पवयीन असल्याचे माहित असतानादेखील एका विवाहित पुरूषाने तिला फोनव्दारे तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मुलीने संवाद टाळल्यानंतर त्याने, तु माझ्याशी बोलली नाहीस तर तुझी बदनामी करेन, कॉलेजमध्ये सांगीन, तुला जगू देणार नाही, अशा धमक्या दिल्या. या धमक्यांना कंटाळून त्या अल्पवयीन मुलीने राहत्या घरी गळफास घेऊन आपले जीवन संपवले. त्याचबरोबर, काही महिन्यांपूर्वी चौल येथे एका १० वर्षीय मुलीबरोबर विनयभंगाचा प्रकार घडला होता. मुलगी शाळेतून घरी येत असताना एका व्यक्तीने ओळखीचा गैरफायदा घेत तिला आपल्या मोबाईलवर अश्लील व्हिडिओ दाखवले आणि तिचा विनयभंग केला. अशाच प्रकारच्या गंभीर घटना पनवेल, महाड, नागोठण्यासह संपूर्ण जिल्ह्यात घडत आहेत. त्यामुळे वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे पुन्हा पुन्हा महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर येत आहे. खरतर रायगड जिल्हा शांतता आणि सुरक्षिततेसाठी ओळखला जातो. महिला व बाल विकास मंत्री देखील रायगडच्या रहिवासी आहेत. तरी देखील जिल्ह्यात गंभीर घटना घडत आहेत. त्यामुळे समाजमाध्यमांवर या सर्व प्रकाराबाबत नागरिकांकडून जोरदार टीका होत आहे. रायगड पोलिसांनी याबाबत ठोस पाऊले उचलावीत. तसेच, लोकप्रतिनिधींनी फक्त मतदान काळात घरोघरी न फिरता वेळोवेळी प्रत्येक घरात जाऊन त्या घरातील प्रत्येक महिलेच्या समस्यांची विचारणा करणे गरजेचे आहे. प्रत्येक गावात पोलिसांच्या पथकांची देखील गस्त असणे गरजेचे आहे. जिल्ह्यात महिलांचे वर्चस्व वाढत आहे. जर लोकप्रतिनिधींना महिलांच्या समस्या जाणुन घ्यायच्या नसतील आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करायच्या नसतील तर महिला पुढारीने निवडूकीच्या रिंगणात उतरावे, जेणेकरून एक महिलाच दुसऱ्या महिलेच्या सुरक्षिततेसाठी धावून येईल, अशी चर्चा सध्या महिला वर्गातून होताना दिसत आहे.

लोकसंसद

## विनोदाचा हुकमी एक्का हरपला.

भारतीय सिनेसृष्टीतील माइलस्टोन ठरलेल्या 'शोले' चित्रपटातील 'हम अंग्रेजों के जमाने के जेलर हैं...' या गाजलेल्या डायलॉगमुळे प्रेक्षकांच्या कायम स्मरणात राहिलेले ज्येष्ठ अभिनेते गोवर्धन असरानी यांचे वयाच्या ८४ वर्षी निधन झाले हिंदी चित्रपटसृष्टीतील चतुरस्र अभिनेते गोवर्धन असरानी मूळचे राजस्थानमधील जयपूरचे रहिवासी होते. 'मेरे अपने' या चित्रपटातील लक्षवेधी व्यक्तिरेखेमुळे ते प्रकाशझोतात आले.



त्यांनी विनोदी कलाकाराच्या रूपात वेगळी ओळख निर्माण केली.असरानी यांनी १९६२ मध्ये सिनेसृष्टीत काम करण्यासाठी मुंबई गाठली. १९६४ मध्ये पुण्यातील फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला. १९६६ मध्ये अभिनयाचे शिक्षण पूर्ण केले. बावर्ची, नमक हराम, घर परिवार, कोशिश, परिचय, अभिमान, महबूबा, पलकों की छाँव में, दो लड़के दोनों कड़के, बंदिश, आज की ताज़ा ख़बर, रोटी, प्रेम नगर, चुपके चुपके, छोटी सी बात, रफू चक्कर, शोले, बालिका बधू, फकीरा, अनुरोध, छैला बाबू, चरस, दिल्लगी, हीरालाल पन्नालाल, हे काही असराणी यांचे गाजलेले चित्रपट त्यांच्यासारख्या अनुभवी आणि हुशार अभिनेत्याच्या निधनाने हिंदी चित्रपटसृष्टीतील महत्वाच्या काळाचा साक्षीदार आणि विनोदाचा हुकूमी एक्का हरपल्याची भावना वक्त होत आहे.असरानी यांनी केलेल्या विनोदी वा चरित्र भूमिका लक्षवेधी ठरल्या. दरम्यानच्या काळात विनोदी चित्रपटांचा जोर ओसरला. मात्र डेव्हिड धवन, प्रियदर्शन यांच्यासारख्या दिग्दर्शकांमुळे जेव्हा विनोदी चित्रपटांना संजीवनी मिळाली, त्या काळात असरानी यांनी पुन्हा चित्रपटांतून आपले स्थान पक्के केले. त्यामुळे 'घरवाली बाहरवाली', 'हेराफेरी', 'गरम मसाला', 'चूप चूपके', 'भुल भुलैय्या', 'दे दना दन', 'धमाल' यातील त्यांच्या भूमिका चिरंतन लक्षात राहतील त्यांच्या जाण्याने चाहत्यांसह भारतीय चित्रपटसृष्टी पोरकी झाली आहे !

**– राजू जाधव, मांगूर**

दिनविशेष

# इडा, पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो ! दिन दिन दिवाळी, गाई-म्हशी ओवाळी!

कार्तिक शुद्ध प्रतिपदा अर्थात बलिप्रतिपदा हा दिवस दिवाळी पाडवा म्हणून साजरा केला जातो. सोने खरेदीस प्राधान्य, सुवासिनींकडून पतीला औक्षण, व्यापाऱ्यांसाठी वर्षाचा प्रारंभ असे या दिवसाचे महत्त्व आहे. फटाक्यांची आतषबाजी, तसेच दीपोत्सवही केला जातो. या दिवसाचे वैशिष्ट्य म्हणजे साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त असून अतिशय शुभ मानला जातो.पाडव्याला पंचरंगी रांगोळीने बळीची प्रतिमा काढून तिचे पूजन करतात. मइडा, पीडा टळो आणि बळीचे राज्य येवा', अशी प्रार्थना या दिवशी केली जाते.

पूर्वी गोकुळवासीयांचा असा समज होता की इंद्र पाऊस पाडतो. म्हणून ते इंद्राची पूजा करीत असत. भगवान कृष्णाने सांगितले की 'इंद्रामुळे पाऊस पडत नाही, गोवर्धन पर्वतामुळे पाऊस पडतो म्हणून पावसासाठी गोवर्धन पर्वताची पूजा करायला हवी.ङ्ग पर्वत आणि वृक्ष यामुळे पाऊस पडतो ही गोष्ट शाळेत शिकवली जाते तीच गोष्ट त्याकाळी भगवान कृष्णाने गोकुळवासीयांना सांगितली. म्हणून दरवर्षी कार्तिक शुक्ल प्रतिपदेच्या दिवशी गोवर्धन पूजा करण्याची पद्धत पडली आहे. तसेच या दिवशी अन्नकूट करण्याची प्रथा आहे. गावातील प्रत्येक जण एकेक खाद्यपदार्थ मंदिरात आणतता. आणलेले सर्व अन्नपदार्थ एकत्र ठेवून तो नैवेद्य ईश्वराला अर्पण केला जातो. नंतर सर्व गावकरी एकत्र बसून त्या प्रसादाचे सहभोजन करतात. प्राचीन काळापासून सर्वांनी एकत्र येऊन प्रसाद खाण्याची प्रथा चालू आहे. पाडव्याच्या दिवशी शेतकरी घराला, गोठ्याला झेंडूच्या माळा लावून सजवतो. गुरांना ओवाळतो. त्यांना गोडधोड घालतो. गोठ्यात काम करणाऱ्यांना यादिवशी सुट्टी दिली जाते. कोकणात गोवर्धन पूजा करताना गोठा स्वच्छ करून तो आधी शेणाने सारवतात, छान सजावट करतात. ही सजावट करताना गोठ्यात शेणाचा गोठा तयार केला जातो. कारिट आणि हिर यांच्या वापर करून गुरे तयार केली जातात. शेणाचा गुराखी, कृष्ण, गौळणी आणि पांडव असा देखावा उभारला जातो. कारिट कापून त्यात दूध घालून त्याचे दूधहंडे केले जातात. यादिवशी पाहुण्यांना खास ताक दिलं जातं. दिवाळी पाडव्याच्या दिवशी घरोघरी सायंकाळी पाटाभोवती रांगोळी काढून पत्नी पतीचे औक्षण करते आणि पती पत्नीला ओवाळणी स्वरुपात काही भेटवस्तू देतो. पत्नीची साथ, सहकार्य आणि सामर्थ्य याप्रती कृतज्ञतेचं प्रतीक म्हणून, तिला पाडव्याच्या दिवशी ओवाळणी अर्थात तिची आवडती भेटवस्तू देतात. खरंतर एक उत्तम सहजीवन साकारणं ही एक कौशल्याची गोष्ट आहे. त्याकरिता दोघांनाही अनेक कसोट्यांमधून सतत जावं लागतं. ते कधीच एका जागी स्थिर, अडकलेलं असू शकत नाही. आजूबाजूची बदलती परिस्थिती, बदलता काळ, वाढत जाणारं वय, अनुभवांची वाढती शिदोरी, त्याने येणारी जाण यामुळे कुठलेही नाते अधिकाधिक प्रगल्भ होत गेले पाहिजे. नवविवाहित दाम्पत्याची 'पहिली दिवाळी पत्नीच्या माहेरी साजरी करतात, यालाच "दिवाळसण" म्हणतात. यादिवशी जावयास आहेर केला जातो. पाडव्या दिवशी काही ठिकाणी मुलगी वडिलांना औक्षण करते. यामागे अशी संकल्पना आहे की जो आपला रक्षणकर्ता आहे, त्याच्याबद्दल मंगलकामना करून कृतज्ञता व्यक्त करणे.

**बलिप्रतिपदा कहाणी**

प्राचीन काळी बळी नावाचा राजा फार बलाढ्य झाला. त्याने सर्व पृथ्वी जिंकली व लक्ष्मीसह सर्व देवांना कैदेत टाकले. मग विष्णूने वामनावतार घेतला व बळीच्या यज्ञात जाऊन त्याच्याकडे तीन पावले मावतील, एवढ्या जमिनीची याचना केली. बळीने त्रिपादभूमी वामनाला दिली. वामनाने दोन पावलांतच पृथ्वी व स्वर्ग व्यापला. तिसरे पाऊल कुठे ठेवू, असं विचारताच बळीने आपले मस्तक नमवून त्यावर तिसरे पाऊल ठेव, असं वामनाला सांगितलं. वामनाने बळीच्या डोक्यावर पाय ठेवून त्याला पाताळात दडपले. सर्वांबरोबर लक्ष्मीचीही सुटका केली, व सर्व देव क्षीरसागरात जाऊन झोपले. हे सर्व आश्विन वद्य त्रयोदशी ते अमावास्या या तीन दिवसांत घडलं. लक्ष्मीची सुटका झाल्यानंतर, ती कायम प्रसन्न असावी म्हणून तिची पूजा करण्याचा प्रघात सुरू झाला. पुराणांत असं सांगितलं आहे की, आश्विनी अमावास्येच्या रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करते व आपल्या निवासासाठी योग्य जागा शोधते. जिथे स्वच्छता, रसिकता असेल, तिथे तर ती आकर्षित होतेच; शिवाय ज्या घरात चारित्र्यवान, कर्तव्यनिष्ठ, संयमी, धर्मनिष्ठ, देवभक्त व क्षमाशील पुरूष आणि गुणवती व पतिव्रता स्त्रिया असतील, त्या घरी वास्तव्य करणं लक्ष्मीला आवडतं. वामनाने जेव्हा तिसरं पाऊल बळीराजाच्या डोक्यावर ठेवलं, तेव्हा त्याने बळीराजाला पाताळात लोटण्यापूर्वी वर दिला की, मतुझी आठवण कायम राहावी म्हणून कार्तिक शु. प्रतिपदेच्या दिवशी लोक तुझ्या नावाने आनंदोत्सव साजरा करतील.फ कृष्णाने बळीराजास असा आशीर्वाद दिल्यानंतर दिवाळीला जोडून बलिप्रतिपदा साजरा करण्याचा प्रघात पडला.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ ऑक्टोबर

१) श्री. रमाकांत रामचंद्र पाटील चेंढरे-अलिबाग २२-११-१९३९
२) श्रीम.मनीषा मनोहर घैसास ब्राम्हणआळी, अलिबाग, २२-११-१९५१
३) श्री. प्रवीण यशवंत पाटील वेश्वी, अलिबाग, २२-११-१९५५
४) श्री.गुरूनाथ नारायण थळे अलिबाग, २२-११-१९५८

## सुवर्णकण



आयुष्यात काय गमावले हे दुःख विसरुन नवीन काय मिळवू शकतो यातच जीवनाचा अर्थ असतो...

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

# रेल्वे प्रवाशांची सुरक्षा धोक्यात

## ● उरणच्या लोकल मार्गावरील स्थानकांमध्ये सीसीटीव्हीची प्रतीक्षा

**| उरण | प्रतिनिधी |**

बहुप्रतीक्षित उरण ते नेरुळ/बेलापूर ही लोकल सुरू होऊन २२ महिने झाले आहेत. मात्र या स्थानकांवर आणि स्थानक परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे नियोजन अद्याप करण्यात आलेले नाही. या मार्गावरील लोकलच्या प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. रात्रीच्या वेळी येणाऱ्या नोकरदार महिलांची सुरक्षा धोक्यात आली आहे.



उरणतेनेरुळ/बेलापूरमार्गावरील पाच स्थानकांच्या परिसरात गेल्या काही दिवसांत अनेक प्रकारच्या घटना घडू लागल्या आहेत. या मार्गावर महिला व विद्यार्थी मोठ्या संख्येने प्रवास करीत आहेत. उरण ते खारकोपर दरम्यानच्या उरण, द्रोणागिरी, न्हावा शेवा आणि शेमटीखार ही स्थानके आहेत. आता यात गव्हाण स्थानकाची भर पडणार आहे. या स्थानकाच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी सिडको की रेल्वेची ही समस्या आहे. मात्र नवी मुंबईतील खारकोपरपासून पुढील स्थानकांच्या ठिकाणी बसविण्यात आलेले सीसीटीव्ही हे मध्य रेल्वेकडून बसविण्यात आले आहेत. मात्र, उरणच्या लोकल मार्गावरील स्थानकांना सीसीटीव्हीची प्रतीक्षा आजही कायम आहे.

उरणच्या स्थानक परिसरात अनेकदा चोरीच्या घटना घडल्या आहेत. तर दुसरीकडे अपघाताचे प्रमाणही वाढले आहे. त्याचप्रमाणे अनेक दिवस उरण स्थानकाच्या प्रवेशद्वारावर अंधार पडला होता. यातील द्रोणागिरी न्हावा शेवा तसेच शेमटीखार या स्थानक परिसरात रात्रीच्या वेळीही वर्दळ कमी असते. त्यामुळे उरण लोकलमधील प्रवाशांच्या सुरक्षेसाठी लवकरात लवकर सीसीटीव्ही बसविण्यात यावेत, अशी मागणी उरणच्या प्रवाशांकडून केली जात आहे.

### नागरिकांच्या समस्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ

या संदर्भात मध्य रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता माहिती घेऊन सांगतो, अशी प्रतिक्रिया दिली. मात्र त्यानंतरच्या नागरिकांच्या समस्यांत दिवसेंदिवस वाढ होऊ लागली आहे. यात प्रामुख्याने दोन तासांच्या अंतराने असलेली लोकल, स्थानक परिसरातील स्वच्छता, महागडे पार्किंग, स्थानकांतील विजेचा खेळखंडोबा, उरण आणि द्रोणागिरी या दोन्ही स्थानकांच्या भुयारी मार्गात साचणारे पाणी या समस्या एकामागून एक समोर आल्या आहेत. त्यातच द्रोणागिरी स्थानकांच्या भिंतीच्या मोठमोठ्या लाद्या निखळून पडत आहेत. त्यामुळे या स्थानकातून प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा धोका निर्माण झाला आहे.

# मोखाड्यात परतीच्या पावसाचा धूमाकूळ

**| ठाणे | प्रतिनिधी |**

एकीकडे दिवाळीचा लखलखाट सुरू असतानाच दुसरीकडे मोखाडा तालुक्यातील शेतकऱ्यांचे अक्षरशः दिवाळे निघाले आहे. रविवारी झालेल्या मुसळधार पावसाने कापणीला आलेले पीक शेतातच आडवे झाल्याने बळीराजाचे अतोनात नुकसान झाले आहे. ऐन सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले असून सण साजरा तरी कसा करणार, असा प्रश्न त्यांच्या कुटुंबाला पडला आहे.



खरीप हंगामात झालेल्या मुसळधार पावसाने मोखाड्याच्या ४९ गावातील १८६ हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे १ हजार ४४१ शेतकरी बाधित झाले सरकारची तुटपुंजी मदत शासनाने कोरडवाहू जमिनीला हेक्टरी १८ हजार ५००, हंगामी बागायतदार क्षेत्र २७ हजार तर बागायती शेतीला ३२ हजार ५०० रुपये अशी तीन क्षेत्रात विभागून मदतीला मंजुरी दिली आहे. पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जमिनी कोरडवाहू क्षेत्रात मोडत असल्याने त्यांना हेक्टरी १८ हजार ५०० रुपये एवढीच तुटपुंजी मदत मिळणार आहे.

परतीचा पाऊस पुन्हा शेतकऱ्यांच्या मुळावर उठल्याने हाताशी आलेले उर्वरित पीकही वाया जाणार आहे. शेतकऱ्यांच्या हाती केवळ पेंढाच लागणार आहे.

# रिक्षा चालक-मालक संघटनेची पूरग्रस्तांना मदत

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

मराठवाड्यातील पूरग्रस्तांना मार्कंडी येथील संभाजी चौक मित्रमंडळाने मदतीचा हात दिला आहे. प्रांताधिकारी आकाश लिगाडे यांच्याकडे ५१ हजार रुपयांचा धनादेश मंडळातर्फे सुपूर्द करण्यात आला.

गेल्या महिन्यात मराठवाडा व विदर्भावर निसर्गाने अवकृपा केली व अतिवृष्टीत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतकऱ्यांची मोठी हानी झाली. त्यामुळे पूरग्रस्तांच्या मदतीसाठी अनेक हात सरसावले. चिपळूणनेही २०२१ मध्ये महापुराचा अनुभव घेतला. त्यावेळी देखील मोठी मदत आली. त्याची उतराई होण्यासाठी शहरातील संभाजी चौक येथील साई मंदिर रिक्षा चालक-मालक संघटनेकडून ५१ हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्यात आला. त्यासाठी न्यू हिंद विजय क्रीडा मंडळ, सुधीर स्पोर्टस्चे अध्यक्ष बंटी सावंत यांचे सहकार्य लाभले. प्रांताधिकारी आकाश लिगाडे यांच्याकडे धनादेश देताना सुनील चव्हाण, संतोष पाटील, विनायक पवार, नथुराम गुडेकर, साई पवार, मंगेश पवार, रमेश जाधव, ऋषिकेश ढगळे, प्रविण शितप, बंटी सावंत, मंदार काणेकर आदी उपस्थित होते.

# पाटगाव येथे रक्तदान शिबीर

**| संगमेश्वर | प्रतिनिधी |**

जिल्हा रुग्णालयात रक्त साठ्याची कमतरता जाणवत असल्यामुळे जय सांबा युवा प्रतिष्ठान, पाटगाव यांनी रक्तदान शिबीर आयोजित केले होते. या शिबिरात २२ रक्ताच्या पिशव्या जमा झाल्या. हे रक्त गरजू रुग्णांना देण्यात येणार आहे. हे शिबिर जिल्हा परिषद केंद्र शाळा, पाटगाव येथे झाले. यावेळी नेहा रवींद्र माने, सरपंच ज्योती गोपाळ, पोलिस पाटील राजाराम खेडेकर, तांबे आदींनी रोपांचे वाटप केले.

# कूपर रुग्णालयात औषधांचा तुटवडा

**| मुंबई | प्रतिनिधी |**

कूपर रुग्णालयात मागील काही दिवसांपासून औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याचे उघडकीस आले आहे. बाह्यरुग्ण विभागामध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना डॉक्टरांकडून उपचार मिळत आहेत, पण रुग्णालयात औषधे उपलब्ध नसल्याने त्यांना रिकाम्या हाताने माघारी जावे लागत आहे. रुग्णांना खासगी औषधालयातून औषधे विकत घ्यावी लागत आहेत. त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना प्रतिजैविके, घशाला खवखव, पित्ताशी संबंधित औषधे, वेदनाशामक औषधांबरोबरच मानसोपचार व श्वानदंशावरील औषधे मिळत नाहीत. श्वानदंश झालेले रुग्ण आल्यास त्याला केवळ धनुर्वाताचे इंजेक्शन दिले जाते. मात्र एआरव्ही व एचआरआयजी ही दोन औषधे रुग्णांना खासगी औषधालयातून विकत घेण्यास सांगितले जाते. यातील एआरव्ही हे इंजेक्शन ६०० रुपये तर एचआरआयजी हे इंजेक्शन सात हजार रुपयांना मिळते. मानसिक उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांनाही औषधे मिळत नाहीत. त्याचबरोबर डायक्लोफिनॅक, पॅन्टोप्रोझोल, ऑगमेंटीन, ॲझिथ्रोमायसिन, जेलोसिल ही सामान्यपणे अनेक दुखण्यांवर देण्यात येणारी औषधेच उपलब्ध नाहीत. त्यामुळे रुग्णालयामध्ये येणाऱ्या रुग्णाला खासगी औषधालयाकडे धाव घ्यावी लागत आहे.

> **मध्यवर्ती खरेदी खात्याकडून रुग्णालयासाठी लागणाऱ्या औषधांच्या खरेदीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. त्यामुळे या आठवड्याच्या अखेरपर्यंत सर्व औषधे रुग्णांना उपलब्ध होतील.**
> **- डॉ. देव शेट्टी, वैद्यकीय अधीक्षक, कूपर रुग्णालय**

# महेश म्हसे पुरस्काराने सन्मानित

**| रसायनी | प्रतिनिधी |**

खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत माडप आणि लोधीवली ग्राम पंचायत अधिकारी महेश म्हसे यांना रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने आदर्श ग्रामसेवक पुरस्कार देऊन सन्मान केल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामपंचायत अधिकारी महेश पुंडलीक म्हसे या रोहा तालुक्यातील धोडखार या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते. प्रशासनातील कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. रोहा तालुक्यातील धोडखार ग्राम पंचायतमध्ये काम करताना



विविध योजनांची अंमलबजावणी करून ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्याचे काम करत असताना त्यांच्या अडिअडचणी सोडविण्याचे प्रामाणिक काम केले. म्हणूनच त्यांना सन २०१९-२० या वर्षाचा रायगड जिल्हा परिषद यांचा आदर्श ग्रामसेवक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## संदीप म्हात्रे यांचे निधन

उरण : उरण तालुक्यातील वशेणी गावचे सुपुत्र संदीप रामचंद्र म्हात्रे यांचे बुधवारी (दि.१५) निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ४६ वर्षे होते. सिंगापूर पोर्ट येथे शिफ्ट मॅनेजर म्हणून ते काम पाहत होते. अत्यंत हुशार शांत व मनमिळावू स्वभावामुळेमुळे कामगारांमध्ये आणि परिसरात परिचित होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ, पत्नी व दोन मुले असा परिवार आहे. त्यांचे दहावे शुक्रवार दि. २४ ऑक्टोबर रोजी, तर बारावे रविवार दि. २६ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी होणार आहेत.



# दापोली आगारात दहा ई-शिवाई बस

**| दापोली | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या रत्नागिरी विभागातील दापोली आगारात दिवाळीच्या मुहूर्तावर १० अत्याधुनिक इलेक्ट्रिक ई-शिवाई गाड्यांचे शनिवारी (दि.१८) स्वागत करण्यात आले. लवकरच आणखी ३० बसेस येणार असून एकूण ४० ई-बसच्या माध्यमातून दापोली आगार प्रवाशांना आधुनिक, पर्यावरणपूरक आणि सोईस्कर प्रवासाची नवी अनुभूती देणार आहे. नागपूर येथून १५ ऑक्टोबरला दापोलीकडे रवाना झालेल्या या बस सोमवारी सकाळी दापोलीत दाखल झाल्या. विशेष म्हणजे, या दीर्घ प्रवासाची जबाबदारी दापोली आगारातीलच १० स्थानिक चालकांनी यशस्वीपणे पार पाडली. या ई-शिवाई बसेस दापोली-पनवेल, दापोली-पुणे, दापोली-बोरिवली आणि दापोली-रत्नागिरी या मार्गांवर धावणार असून, लवकरच नियमित फेऱ्या सुरू होणार आहेत. यामुळे दिवाळी सुटीत गावी कोकणात येणाऱ्या प्रवाशांची सोय होणार आहे. प्रदूषणमुक्त आणि आरामदायी अशा या बसमधून प्रवास करण्याची उत्सुकता प्रवाशांना लागून राहिली आहे.

# कोकणचा हापूस एपीएमसी मार्केटमध्ये दाखल

**| ठाणे | प्रतिनिधी |**

दिवाळीच्या तोंडावर मुंबईकरांसाठी आणखी एक गोड भेट आली आहे. कोकणचा सुप्रसिद्ध हापूस आंबा वाशी येथील एपीएमसी मार्केटमध्ये दाखल झाला आहे. सणासुदीच्या काळात आंब्याच्या मोहक सुगंधाने बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण पसरले असून, ग्राहकांमध्ये विशेष उत्सुकता पाहायला मिळत आहे. दिवाळीच्या दिवसात दाखल झालेल्या या आंब्याच्या पेटीला विक्रमी भाव मिळणार असल्याचे म्हटले जात आहे.



हापूस आंब्याचा मुख्य हंगाम हा मार्च ते जून दरम्यान असतो. परंतु, हवामानातील बदलामुळे तसेच योग्य पद्धतीने आंब्याच्या मोहोरची निगा राखली तर, काही वेळा तो ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्येही मर्यादित प्रमाणात दिसून येतो. देवगड येथील पडवणे गावातील शिर्सेकर यांच्या बागेत जुलै महिन्यात तीन ते चार कलमांना आगाऊ मोहोर आला होता. त्यातील दोन कलमांवरील मोहराचे त्यांनी प्लास्टिक आवरण घालून संरक्षण केले होते.

योग्य काळजी आणि फवारणीमुळे त्या कलमांवर सुमारे पाच पेट्यांइतकी फळधारणा झाली. त्यापैकी पहिली ६ डझन हापूस आंब्याची पेटी त्यांनी दिवाळीच्या पहिल्या दिवशी म्हणजेच नरक चतुर्दशीला सोमवारी (दि.२०) वाशी मार्केटकडे रवाना केली आहे. त्यामुळे यावर्षीच्या मोसमी हापूस आंब्यांच्या विक्रीचा प्रारंभ या पेटीद्वारे झाला असून, हापूसच्या पहिल्या पेटीचा मान शिर्सेकर यांना मिळाला आहे.

वाशी येथील नानाभाऊ जेजुरकर अँड कंपनी या दलालमार्फत ही आंबापेटी विक्रीस ठेवली जाणार आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आंबा पेटी विक्रीस ठेवण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे बाजार समितीतील दलालवर्गाकडून सांगण्यात येत आहे.

## गोल्डन अवरमध्ये मिळणार उपचार | अपघातग्रस्त रुग्णांमधील मृत्यूदर होणार कमी

# मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये ट्रॉमा सेंटर सुरु

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

अपघात झाला की सर्वप्रथम अपघातग्रस्तांना गरज असते ती तातडीच्या सर्वोत्कृष्ट वैद्यकीय उपचारांची. त्यामुळे अपघातानंतरचा एक तास म्हणजेच गोल्डन अवर खुप मोलाचा ठरतो. या काळात वेळीच उपचार मिळाल्यास अपघातग्रस्ताचे प्राण वाचतात. नवी मुंबईतील खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलने शहरातील पहिले आणि सुसज्ज असे प्रगत ट्रॉमा सेंटर सुरू केले आहे.



ट्रामा केअर युनिटमध्ये सगळ्या प्रकारच्या अपघातांवर एकाच छताखाली सर्व उपचार उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या युनिटमध्ये न्यूरोसर्जन, इंटेन्सिव्हिस्ट, जनरल सर्जन, ऑर्थोपेडिक सर्जन, ॲनेस्थेसिस्ट, कुशल परिचारिका यांचा समावेश असणार आहे. तसेच ऑपरेशन थिएटर आणि अतिदक्षता विभागात सर्व प्रकारची अत्याधुनिक उपकरणे, सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या सेंटरच्या शुभारंभ प्रसंगी आपत्कालीन यंत्रणेसाठी लागणारी साधनसामग्री येथे उपलब्ध असून रुग्ण दाखल झाल्यापासून त्याची प्रकृती स्थिर होईपर्यंतची सगळी काळजी या युनिटमध्ये घेतली जाते.

मेडिकव्हर हॉस्पिटलने सीपीआर प्रशिक्षण आणि मेडिकव्हर लाईफ सेव्हर प्रोग्राम देखील सुरू केला आहे. जेणेकरून गंभीररित्या जखमी रुग्णांना मदत करण्यासाठी नागरिकांनाही सक्षम केले जाईल. मेडिकव्हर हॉस्पिटलने रुग्ण-केंद्रित आरोग्यसेवा प्रदान करण्यासाठी प्रगत ट्रॉमा सेंटर सुरू करत एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या कार्यक्रमात रुग्ण, रुग्णवाहिका चालक, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक रहिवासी आणि आरटीओ अधिकाऱ्यांसह १०० हून अधिक व्यक्तींनी सहभागी झाल्या होत्या.

मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे कॉम्प्लेक्स ट्रॉमा, पेडियाट्रिक ऑर्थोपेडिक्स आणि इलिझारोव्ह सर्जन डॉ. नितीश अरोरा सांगतात की, अपघातग्रस्तांना तातडीच्या वैद्यकिय उपचारांची गरज असते. आघातग्रस्त रुग्णांमधील मृत्यूदराचे प्रमाण देखील जास्त आहे. अपघातानंतर पहिल्या एक तासात म्हणजेच गोल्डन अवरमध्ये वैद्यकीय मदत दिली पाहिजे. आपत्कालीन परिस्थितीत ८६५५८४५८६१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.

विशेष आपत्कालीन टीम आणि ट्रॉमा केअरसाठी समग्र दृष्टिकोनासह, नव्याने सुरू केलेले ॲडव्हान्स्ड ट्रॉमा सेंटर नवी मुंबईकरांसाठी एक जीवनरक्षक केंद्र ठरणार असल्याचे वक्तव्य मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रदेशाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल यांनी केले.

अपघातग्रस्त विकास गुप्ता यांनी त्याच्यावरील आपत्कालीन प्रसंगाविषयी बोलाताना सांगितले की, मला आयुष्यात दुसरी संधी दिल्याबद्दल मी मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांचा कायम आभारी राहीन. प्रत्येक सेकंद महत्त्वाचा असताना ट्रॉमा सेंटरने प्रसंगावधान राखत त्वरीत उपचार केले.

## निवडक

### वाहतूक पोलिसांनी लॅपटॉप केला परत



**पनवेल** : पनवेल शहर वाहतूक शाखेतील पोलिसांना रस्त्यावर सापडलेला महागडा लॅपटॉप संबंधिताला परत करण्यात आला. पोलीस हवालदार युवराज येळे, अमिर मुलाणी व राजपूत यांना शिव कॉम्प्लेक्स चौकी ते एचडीएफसी सर्कल येथे वाहतूक नियमन करीत असताना ॲपल कंपनीचा लॅपटॉप रस्त्यावर सापडला. या तिघांनी याबाबत वरिष्ठांना माहिती देऊन सोशल मीडियावर प्रसारित केली. त्यानुसार पनवेल तालुक्यातील पारगाव-दापोली येथील विनोद जितेकर यांनी संपर्क साधला. त्याबाबत खात्री झाल्यानंतर हा लॅपटॉप जितेकर यांच्या कुटुंबीयांकडे परत करण्यात आला आहे. याबद्दल पनवेल शहर वाहतूक शाखेचे कौतुक करण्यात येत आहे.

### पोलीस स्मृती दिनानिमित्त विविध उपक्रम

**नागोठणे** : नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्याकडून नागोठणे पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या गावे, वाडी, वस्त्यांवर विविध जनजागृतीपर उपक्रम राबविले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून तसेच पोलीस स्मृति दिनाचे औचित्य साधून मंगळवारी (दि.२१) सकाळी १० ते १२ वाजण्याच्या दरम्यान विद्यार्थ्यांसाठी नागोठणे पोलीस ठाण्यात विविध उपक्रम राबविण्यात आले. यानिमित्ताने रायगड जिल्हा परिषदेच्या चिकणी, पाटणसई, घोगरकरवाडी, वासगाव, लाव्याची वाडी, कार्ली या शाळेतील मुलांसाठी कार्यशाळा व निबंध, वक्तृत्व अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी ७० ते ८० विद्यार्थी व पाच शिक्षक उपस्थित होते. नागोठणे पोलीस ठाण्यात घेण्यात आलेल्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना सागरी सुरक्षा संदेश, सायबर क्राईम, गुड टच, बॅट टच, अल्पवयीन विवाह व पोलिस ठाणे कार्यप्रणाली याबाबत माहिती देण्यात आली. तसेच या सर्व बाबतीत नागोठणे परिसरात जनजागृती व्हावी याकरिता नागोठणे पोलीस ठाणे हद्दीतील बाजारपेठ, कोळीवाडा, खुमाचा नाका, जोगेश्वरी मंदिर, अंगार आळी, खडक आळी या भागातून विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीत सपोनि सचिन कुलकर्णी यांच्यासह अन्य पोलीस कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले होते.

### फटाक्यांच्या धुरामुळे प्रदूषणात भर

**नवी मुंबई** : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेत घसरण झाली आहे. शहराची हवा 'मध्यम' श्रेणीत नोंदली गेली आहे. कमी झालेला वाऱ्याचा वेग आणि आर्द्रतेमुळे प्रदूषके हवेत साचून राहिल्याने वातावरण अधिक दूषित होत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञांनी नोंदवले आहे. त्यातच बांधकाम प्रकल्पांमधून उडणारी धूळ, औद्योगिक क्षेत्रातून उत्सर्जित होणारा रासायनिक धूर आणि फटाक्यांचा धूर मिळून पुढील काही दिवसांत हवेची गुणवत्ता आणखी खालावण्याची शक्यता वर्तवली जात आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या 'समीर' ॲपनुसार सोमवार २० ऑक्टोबर रोजी नवी मुंबईचा हवा गुणवत्ता निर्देशांक सरासरी १९२ इतका नोंदला गेला. नेरुळ येथे हवा निर्देशांक सर्वाधिक म्हणजे २४६, त्याशिवाय महापे येथे १०५, कळंबोली १९३ तर तळोजा येथे २२२ इतका हा निर्देशांक होता. हे सर्व आकडे 'मध्यम' ते 'वाईट' श्रेणीत मोडणारे आहेत. यापूर्वी शुक्रवार १७ ऑक्टोबर रोजी शहरातील हवेची गुणवत्ता पातळी ६४ म्हणजे समाधानकारक श्रेणीत होती. मात्र, शनिवारपासून हवेची गुणवत्ता पातळी अनुक्रमे ११० आणि रविवारी १६७ इतकी नोंदवली गेली. त्यामुळे शहरातील हवेची गुणवत्ता पातळी दिवसेंदिवस ढासळत असल्याचे दिसून आले आहे.



### मच्छी वाहतूक करणारा टेम्पो उलटला

**गुहागर** : चिपळूण महामार्गावरील चिखली येथे सोमवारी (दि.२०) दुपारच्या दरम्यान अंजनवेल ते रत्नागिरी मच्छी वाहतूक करणारा टेम्पो रस्त्यावर उलटला. या अपघातात टेम्पोचा क्लीनर जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, टेम्पो अंजनवेलकडून रत्नागिरीच्या दिशेने मच्छी घेऊन जात होता. चिखली परिसरात आले असता चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि टेम्पो रस्त्यावर उलटला. अपघातामुळे टेम्पोतील सर्व मच्छी रस्त्यावर विखुरली गेली, तर टेम्पोचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. अपघातात क्लीनर जखमी झाला असून, त्याला प्राथमिक उपचार देण्यात आले. सुदैवाने या अपघातात कोणतीही मोठी जीवितहानी झाली नाही. अपघातामुळे महामार्गावरील वाहतुक काही काळ विस्कळीत झाली होती अपघातग्रस्त टेम्पो रस्त्याच्या बाजूला केल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.






### मुलांच्या चेहऱ्यांवर खुलले हास्य

**रोहा** : दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर रोटरी क्लब ऑफ रोहा सेंट्रलच्यावतीने यशवंतखार व सानेगाव आदिवासी वाडीवरील लहानगयांना कपडे वाटप करण्यात आले. दिवाळीत वाडीवस्तीवर गोड कार्यक्रम पार पडल्याने आदिवासी समाजातील मुलांच्या चेहऱ्यांवर आनंदाचे क्षण दिसून आले. या आयोजित छोटेखानी कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना अध्यक्ष विजय दिवकर व माजी अध्यक्ष मयूर दिवेकर म्हणाले की, आज समाजातील दीन दुबळ्या लोकांना कपडे वाटप करण्यात आले. तसेच, या गोड उपक्रमाच्या माध्यमातून समाजातील गरीब लोकांची देखील दिवाळी गोड जावी, हा या मागचा मुख्य उद्देश असल्याचे माजी अध्यक्ष मयुर दिवेकर व विद्यमान अध्यक्ष विजय दिवकर यांनी मनोगत व्यक्त करत संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. अमरदिप क्लोथ सेंटरचे मालक विकास जैन यांनी या कार्यक्रमासाठी कपडे उपलब्ध करून दिले. तसेच मयुर दिवेकर यांच्यावतीने दोन्ही वाड्यांवर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उटणे, साबण वाटप केले.

# उरणमध्ये गडगडाटासह जोरदार पाऊस

## ।। शेतात साचलेल्या पाण्यात पीके आडवी ।। चिरनेर परिसरातील भाताचे मोठे नुकसान

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

गेल्या आठ-दहा दिवसापासून विश्रांती घेतलेल्या, परतीच्या पावसाने मंगळवारी चारच्या सुमारास विजेच्या गडगडाटासह हजेरी लावल्याने, या अचानक वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे शेतातील भातपिके शेतात साचलेल्या गुडघाभर पाण्यात आडवी झाली आहेत. तर कापून ठेवलेली पीके तसेच शेतात सुरू असलेल्या भाताच्या मळण्या देखील भिजून गेल्या आहेत.

उरण तालुक्यातील चिरनेर परिसरातील भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच सर्वत्र सुरू असलेल्या दीपावलीच्या सणावर पावसाचे सावट पसरले आहे.



विशेषता: सध्या या भागात सर्वत्र भातशेती कापणीचा हंगाम सुरू झाला आहे. त्यामुळे कुठे कापणी सुरू आहे. तर कुठे भाताची मळणी सुरू आहे. तर आदिवासी वाड्यांमध्ये नाचणी, वरी या पिकांची कापणी सुरू आहे.

मात्र, बुधवारी अचानक आलेल्या पावसाने ऐन कापणीच्या मोसमात हजेरी लावल्याने शेतकऱ्यांची मेहनत वाया जात असून, शेतकरी वर्ग चिंतेत आहे. या भागात बऱ्याच ठिकाणच्या भात खाचरातील भाताचे पीक पूर्णपणे तयार झाले आहे. तर काही ठिकाणी १४५ दिवसांची भातपिके दाणे भरण्याच्या अवस्थेत आहेत.

ज्या भात शेतात भात पीके तयार झाली आहेत. अशी पीके शेतकऱ्यांनी कापून शेतात सुकवायला ठेवली आहेत. तर काही ठिकाणी भाताची मळणी सुरू आहे. परंतु अचानक परतीच्या पावसाने ऐन कापणीच्या मोसमात हजेरी लावल्याने भातपिके शेतात भिजून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची मेहनत वाया जात असून, शेतकरी वर्ग चिंतेत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून नेण्याची भीती शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

दरम्यान आज दुपारपासूनच अचानक काळे ढग येऊन विजेच्या गडगडाटासह पाऊस कोसळला. पाऊस नेमक्याच दिवाळीच्या तोंडावर वादळ वाऱ्यासह पडला. बहुतांशी ठिकाणी भात कापणी सुरुवात झाली आहे.

> अचानक आलेल्या परतीच्या पावसामुळे शेतातील भात पीके आडवी झाली आहेत. तसेच कापलेली व मळणीची भातपिके भिजून गेली आहेत. विजांच्या कडकडाटामुळे मजूरही शेतीचे काम सोडून घरी परतले. पाऊस थांबला नाही तर शेतात आडवी झालेली भात पीके कुजून जाण्याची शक्यता आहे.
> –के. बी. ठाकूर, शेतकरी चिरनेर

मात्र, आता परतीच्या पावसाने बळीराजांस मोठ्या संकटात सापडलेले आहे. तसेच पुढील काही दिवसात भात कापणी करावी की नाही याच विचारश्तकऱ्यास स्वस्त बसू देत नाही.

# निवडक



## दिपावलीच्या निमित्ताने साखरेचे वाटप

**सुकेळी :** रोहा तालुक्यातील नागोठणे जवळच असलेल्या वांगणी येथील एकनाथ ठाकुर व अदिती ठाकूर यांच्या वतीने दिपावली गोड सणाचे औचित्य साधून एक सामाजिक बांधिलकीची भावना जपत नुकतेच वांगणी गावातील प्रत्येक कुटुंबाला दोन किलो. याप्रमाणे एकूण ४०० किलो साखरेचे वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला भरत यादव, प्रविण कदम, सुरेश तेलंगे, प्रकाश ठाकुर, जय गोळे, शुभम तेलंगे, जितेंद्र दळवी, सखाराम ठाकुर, संभव ठाकूर, अरुण ठाकूर, शरयु ठाकुर, रितीका पोलेकर, ओवी पिंगळे, अदिती ठाकुर यांच्यासह वांगणी ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## गळफास घेऊन आत्महत्या

**पनवेल :** कोणत्यातरी अज्ञात कारणाने एक तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना करंजाडे येथे घडली आहे. विशाल रावत (वय २५) याने ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## बसमध्ये चढताना दागिने लंपास

**पनवेल :** पनवेल एसटी स्टॅन्डमध्ये पनवेल अलिबाग बसमध्ये एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे चैन मंगळसूत्र चोरून अज्ञात इसम पसार झाल्याची घटना घडली आहे. चित्रांगी म्हात्रे वय ४७ या पनवेल एसटी स्टॅन्डमध्ये पनवेल अलिबाग बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या गळ्यातील जवळ पास ७७ हजार रुपये किमतीचे सोन्याचे चैन मंगळसूत्र चोरून तो पसार झाला आहे. या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## निजामपुरात दिवाळी पहाट कार्यक्रम

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील श्री सुनिलजी तटकरे युवा प्रतिष्ठान व बाबूशेठ खानविलकर मित्रमंडळ निजामपूर विभाग यांच्यातर्फे आयोजित दिवाळी पहाट स्वरस्पर्श एक स्वरमयी एक सुरेल मैफिल .... कार्यक्रमाचा निजमपूर वासियांनी पहाटेच्या निसर्गरम्य वातावरणात दिवाळी पहाट कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. या कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमात दरवर्षी प्रमाणे यावर्षीही निजामपूर विभागातील शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीयन कामगिरी केलेल्या विद्यार्थी, तरुण, तरुणींना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## सफाई जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



**उरण :** आदिवासी बांधवांना आनंदात साजरी करता यावी यासाठी राजू मुंबईकर यांनी पनवेल येथील तारा ग्रामपंचायत हद्दीतील कोरळवाडी आणि उरण तालुक्यातील पुनाडे आदिवासीवाडी या आदिवासी वाडीवरील आदिवासी बांधवांना जीवनावश्यक वस्तू देण्यात आल्या. याप्रसंगी राजू मुंबईकर, अविनाश सिंग, स्नेहल पालकर, विलास ठाकूर, सुरेंद्र पाटील, देवन ठाकूर, नितेश मुंबईकर,अनिल घरत, समाधान पाटील, नवनीत पाटील, संपेश पाटील, रोशन,पाटील, क्रांती म्हात्रे, मयंक पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- मुलं, मुली पाहिजेत कामासाठी १० वी १२ वी पास औषधांच्या एजन्सीमध्ये part time सुद्धा चालेल. वेळ : १०.०० am to ७.०० pm
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- अलिबागमध्ये कळंबादेवी मंदिर शेजारी नवीन बिल्डिंग पहिल्या मजल्या वरचे सलग दोन गाळे विकणे /भाड्याने देणे आहे. संपर्क ९१४६६८५१००
- अलिबाग, रोहा रोड येथे मालाड़ेगावी १०-२० गुंठ्याचे संपूर्णतः डेव्हलप केलेले प्लॉट विकणे आहेत. ९८२२२५७९२९/ ८४०८९३०८१५
- अलिबाग, किहीम येथे, रिसॉर्टमध्ये ५०% भागीदार पाहिजे. (रु. २ कोटी ७५ लाख इन्व्हेस्टमेंट) जमीन १७ गुंठे. चार कॉटेज बांधलेली, जागा समुद्रापासून ३०० मीटर आणि गावठाणा जवळ आहे, बस - रिक्षा स्टॅन्ड जवळ आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- अलिबाग, चौल येथे ७२ गुंठे जागा (१६ गुंठे बागायत + ५६ गुंठे शेत जमीन एकत्रित) रिसॉर्टसाठी संपादित केलेली आहे. या जागेमध्ये ५०% भागीदार पाहिजे. जागा मेन रोड आणि मुखरी गणपती मंदिराजवळ आहे. जागेची किंमत रुपये ६.५ कोटी आणि पुढील डेव्हलपमेंट एकत्रित करायची आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी मुलींची आवश्यकता आहे. ज्यूस मेकिंग, रेस्टॉरंट सर्व्हिस, रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# वाचन प्रेरणा दिन साजरा



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभाग यांच्या अंतर्गत भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने वाचन प्रेरणा दिन उरण महाविद्यालयात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी डॉ. अब्दुल कलाम यांच्या कार्याविषयी आढावा युट्युबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सांगण्यात आला. यावेळी खुशी शर्मा, कनिशा पाटील, प्राप्ती पांगुळ यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व सांगण्यात आले. वाचन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी कलाम यांची विषयी अनेक पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. तर डॉ. आनंद गायकवाड यांनी त्यांचे तात्विक विचारांचे विचारधन विद्यार्थ्यांसमोर ठेवण्यात आले. याप्रसंगी डॉ. एम. जी लोणे, डॉ. ए. आर चव्हाण, प्रा. आर. टी. ठवरे, प्रा. विनिता तांडेल, प्रा. हन्नत शेख, प्रा. पूजा गुप्ता व मोठ्या संख्येने विद्यार्थी हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आरती पाटील हिने केले.

## भरत दोशी यांचे निधन

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठणे बाजारपेठमधील व्यापारी भरत मांगीलालजी दोशी-जैन (वय ५५) यांचे शुक्रवार (दि. १७) ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे यांच्यासह मोठा परिवार आहे. दिवंगत भरत दोशी यांच्या पार्थिवावर नागोठणे अंबा घाटावरील वैंकुठ स्मशानभूमीत शनिवार (दि .१८) ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नागोठणे शहर व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, नागोठणे बाजार पेठेतील व्यापारी वर्ग, दोशी परिवारातील नातेवाईक, मित्रपरिवार व नागोठण्यातील नागरिक यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

# अंबाजींची अध्यक्षपदी निवड



**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुड जंजिरा सार्वजनिक वाचनालय कार्यकारी मंडळाच्या झालेल्या सभेत जयवंत अंबाजी यांची सर्वानुमते निवड करण्यात आले. सदर सभेमध्ये २०२५ ते २०२८ या वर्षासाठी सार्वजनिक वाचनालय मुरुड जंजिराच्या नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे.

यावेळी उपाध्यक्ष दिपाली जोशी, सचिव अच्युत चव्हाण, खजिनदार नितीन पाटील, पुस्तक निवड समिती प्रमुखपदी प्रवीण बैकर, सांस्कृतिक समिती प्रमुख पदी सिद्धेश लखमदे यांची निवड करण्यात आली तसेच सदस्य म्हणून नैनिता कर्णिक, विनय मथुरे, निवास रसाळ, संजय कासेकर, शैलेश वारेकर यांची नियुक्ती करण्यात आली. विनय मथुरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मानसिक स्वास्थ्य जागृतीसाठी रॅली

**| पनवेल | प्रतिनिधी |**

लायन्स इंटरनॅशनलतर्फे या वर्षी प्रथमच मानसिक स्वास्थ्य आणि आरोग्या विषयी जनजागृती करण्यासाठी विशेष सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाचे निमित्ताने डॉ. मानदा पंडित यांनी लायन्स डिस्ट्रिक्ट ३२३१ ए ४ यांनी पनवेल येथे एका भव्य रॅलीचे आयोजन केले होते. सदर रॅलीला महात्मा गांधी उद्यान येथून प्रांतपाल संजीव सुर्यवंशी आणि काळसेकर कॉलेजचे डायरेक्टर डॉ. रमझान खाटिक यांनी झेंडा दाखवून सुरुवात केली.

सदर रॅलीमध्ये काळसेकर टेक्निकल कॉलेजचे विद्यार्थी, कर्मचारी वर्ग, लायन्स, लिओ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सदर रॅली गोखले सभागृह, सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल, सारस्वत बँक, एच ओ सी कॉलनीमार्गे फिरुन काळसेकर कॉलेज येथे विसर्जित झाली. त्यानंतर कॉलेजच्या सभागृहात मानसिक स्वास्थ्य आणि आरोग्य या विषयावर मानदा पंडित आणि आदित्य दोशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या रॅलीमध्ये विजय गणात्रा, आर. पी पांडे, नमिता मिश्रा, डॉ. राजेंद्र मगर, डॉ. शारिक सय्यद, डिस्ट्रिक्टमधील विविध लायन्स आणि लिओ क्लबचे पदाधिकारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर रॅलीच्या आयोजनासाठी प्रेमेंद्र बहिरा, संजय गोडसे, धवल शहा, अल्केश शहा, स्वाती गोडसे, ओंकार खेडकर, संध्या महानुभाव, मुजम्मिल, शोएब, सुरभी पेंडसे, अशोक गिल्डा, सुयोग पेंडसे यांनी खूप परिश्रम घेतले.

## घोणस जातीच्या सापाला जीवदान

**माथेरान :** माथेरानमधील पंचवटी नगर विभागातील नागरी वस्ती मध्ये घोणस जातीचा विषारी साप निदर्शनास आला असता त्याला माथेरान निसर्ग मित्र संस्थेचे सर्प मित्र अनिकेत मोरे यांनी अगदी शिताफीने पकडून या घोणस जातीच्या विषारी सापाचा जीवदान देऊन त्याला त्याच्या मुख्य अधिवासात सोडून दिले. माथेरान पंचवटी नगर भागातील लोकवस्तीमध्ये दि.२० रोजी रात्री उशिरा एक भला मोठा साप एका घराच्या अंगणात फिरताना दिसला. यावेळी सर्पमित्र अनिकेत मोरे शिताफीने त्यांनी त्या सापाला पकडून रिस्क्यू करुन अधिवासात सोडून देण्यात आले.

# कामगारांच्या बंदमुळे कचऱ्याचे साम्राज्य




**| माथेरान | प्रतिनिधी |**

आपल्या मागण्यांची पूर्तता होत नसल्याने स्वच्छता घनकचरा व्यवस्थापन कंत्राटी कामगारांनी तीन दिवसांपासून काम बंद केल्यामुळे गावात घाणीचे साम्राज्य पसरले असून विविध ठिकाणी दुर्गंधी येत असल्याने विशेषतः मटण मार्केट भागात नाक मुठीत धरून जावे लागत आहे. तर घरोघरी कचरा गोळा करणारे कामगार सुध्दा कचरा नेत नसल्याने अखेरीस आजूबाजूच्या गटारात कचरा टाकला जात आहे. मुख्य बाजारपेठमध्ये सुध्दा सुका कचरा काहींनी नाईलाजाने रस्त्याच्या कडेला ठेवला आहे परंतु रेस्टॉरंट, हॉटेलमधील ओला कचरा गोळा न केल्याने दुर्गंधी पसरली आहे. याबाबत समाज माध्यमांवर कचऱ्याचे फोटो येत असून प्रशासनाने याबाबत लवकरात लवकर पर्यायी व्यवस्था निर्माण करून कचरा उचलण्यात यावा. सणासुदीच्या दिवसात अशा प्रकारे कामगार वर्गाने नागरिक व पर्यटकांना वेठीस धरणे योग्य नाही. मुख्याधिकाऱ्यांनी सर्व बाबीचा विचार करून योग्य तो मार्ग काढावा किंवा पर्यायी व्यवस्था तयार करावी, घनकचरा व्यवस्थापनेतील कर्मचाऱ्यांचा संप सुरु असल्याने गेल्या तीन दिवसांपासून ऐन सणासुदीच्या काळात नागरिकांच्या घरातील कचरा तसाच पडून आहे प्रशासनाने याची तात्काळ दखल घेऊन संबंधित ठेकेदार व कर्मचाऱ्यांसोबत चर्चा करून त्यांच्या मागण्या रास्त असल्यास त्यावर तोडगा काढावा व नागरिकांना भेडसावणारी ही समस्या दूर करावी अशा चर्चा रंगू लागल्या आहेत.

# बच्चे कंपनींनी साकारल्या महाराजांच्या किल्ल्यांच्या प्रतिकृती

**| पनवेल | प्रतिनिधी |**

दीपावली सण जवळ येताच पनवेलमध्ये पारंपरिक किल्ले बनवण्याची जुनी परंपरा पुन्हा जिवंत झाली आहे. कुंभारवाडा परिसरात या वर्षीही उत्साहात छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले आणि शूर मावळ्यांच्या प्रतिकृती बनवण्याचे काम सुरू झाले आहे.

माती, विटा, रंग आणि मेहनतीच्या जोरावर तयार होणारे हे किल्ले पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांची गर्दी होत आहे. आजच्या मोबाईलच्या युगात लहान मुले डिजिटल खेळात रमलेली असताना, त्यांना स्वराज्याचा इतिहास आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रम ओळखून देण्यासाठी ही परंपरा प्रेरणादायी ठरत आहे. ज्येष्ठ नागरिक, पालक आणि तरुण एकत्र येऊन मुलांना या कामात सहभागी करून घेत आहेत. किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे, तोफ, ध्वज, किल्ल्यांच्या तटबंदीची सजावट आणि मावळ्यांच्या प्रतिमा लावून संपूर्ण दृश्य जीवंत करण्यात येते. दीपावलीत या किल्ल्यांमुळे केवळ सणाची शोभा वाढत नाही, तर स्वराज्य आणि इतिहासाबद्दल अभिमानाची भावना प्रत्येकाच्या मनात जागवली जाते.



● अलिबाग तालुक्यातील श्रीगाव येथील आश्विक गणेश पाटील याने बनविलेला किल्ला. (छाया : सचिन पाटील)



● अलिबाग तालुक्यात नेहुली येथील मयुरेश पाटील यांनी साकरलेला लोहगड किल्ला.

# पालीत रायगड किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**



(छायाचित्र गौसखान पठाण)

पालीतील स्वामी समर्थ नगर येथील हरी ओम वास्तू सोसायटीच्या रहिवाशांनी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर इतिहास आणि संस्कृतीचा संगम साधत छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगड किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती साकारली आहे. ही प्रतिकृती पाहण्यासाठी परिसरातील नागरिक, विद्यार्थी, आणि पर्यटक मोठ्या संख्येने गर्दी करत असून, दिवाळीच्या सजावटीत एक वेगळीच प्रेरणा मिळत आहे.

सदर प्रतिकृतीत रायगड किल्ल्यांचे दरवाजे, बालेकिल्ला, होळीचा माळ, राजसभा मंडप, आणि जगदीश्वर मंदिर यांचे अत्यंत बारकाईने आणि कलात्मकतेने दर्शन घडवले आहे. दिवाळीच्या पारंपरिक सजावटीला इतिहासाची जोड देत हरी ओम सोसायटीच्या तरुणांनी आणि ज्येष्ठांनी मिळून ही कलाकृती साकारली आहे.

रायगड किल्ल्याच्या प्रतिकृतीमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, अनेकांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. शिवप्रेमी, इतिहासप्रेमी आणि नागरिकांनी या प्रतिकृतीला भेट देऊन फोटो, व्हिडीओ आणि सामाजिक माध्यमांवर सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या आहेत.



● मुरुड बाजारपेठेत दिवाळीसाठी प्रत्यक्ष दुकानात रोषणाई केली आहे.बाजार खरेदीसाठी बहरला आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# चौलचौकी ते वावे रस्त्याची दुरवस्था



। रेवदंडा । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील चौलचौकी ते वावे या मुख्यः रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यात खड्डेच खड्डे पडले आहेत. पावसाच्या दिवसात काही ठिकाणी चक्क खड्ड्यांची तळी बनली होती, मात्र पाऊस ओसरला, तरी खोलगट खड्डे फारच धोकादायक व अपघातास आमंत्रण ठरत आहेत.

चौलचौकी येथून वावे नाक्यावर जात असलेला मुख्यः रस्ता सद्यस्थितीत लहान मोठया वाहनांची नित्याने ये-जा असते. रेवदंडा ही पंचक्रोशीतील प्रमुख बाजारपेठ आहे, त्यामुळे वावे व परिसरातील ग्रामीण गावातील ग्रामस्थ व्यापार व्यवसाय, खरेदी विक्री आदीसाठी रेवदंडा बाजारपेठेवर अवंलबून असतात. गेल्या काही वर्षात वावे नाक्यावर अमूलाग्र परिवर्तन घडून सुसज्ज बाजारपेठ तयार झाली आहे. शिवाय नजीकच खानाव-उसर परिसरात गेल इंडिया कंपनी, एच.पी.सि.एल. कंपनी असल्याने या रस्त्याला वाहतूक वाढ झालेली दिसते. अलिबागकडे जाण्यासाठी अवजड वाहने या मार्गाचा अवलंब करत असल्याने चौलचौकी ते वावे रस्ता महत्वाचा ठरतो आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एप्रिल महिन्यात निरूपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेटीस आले असता त्यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात रेवदंडा मारूती मंदिराचा प्रांगणात या रस्त्याचे नूतनीकरणाचे श्रीफळ वाढवले होते. या रस्त्याच्या नूतनीकरणाचे निधी मंजूर, व भूमिपूजन सुध्दा झाले, मग या रस्त्याचे नूतनीकरणास केव्हा सुरूवात होईल, असे प्रवासीवर्ग तसेच स्थानिक ग्रामस्थ प्रश्न उपस्थित करत आहेत.

चौलचौकी ते वावे दरम्यान येत असलेल्या चौल भोवाळे येथील प्रसिध्द श्री दत्तयात्रा पुढील काही दिवसात येत आहे. त्यापूर्वीच अगदीच मेटाकुटीस व दयनीय अवस्थेत असलेला चौलचौकी ते वावे रस्ता संबंधितांनी त्वरीत नूतनीकरण करावे, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

# आंबेवाडी बाजारपेठेतील गटारे, सर्व्हिस रोडबाबत दिले निवेदन



। कोलाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गांवरील आंबेवाडी बाजारपेठेतील चौपदरीकरणाच्या काम अनेक वर्षांपासून सुरु असुन या बाजारपेठेतील गटारे, सर्व्हिस रोड तसेच व्हेईकल अंडरपास रस्ता अशा विविध समस्यांन विषयी कोलाड नागरिकांनी मुंबई-गोवा हायवेच्या प्रकल्प संचालकाला निवेदन देण्यात आले.

यावेळी संजय कुर्ले, चंद्रकांत लोखंडे, महेंद्र वाचकवडे, दिपक कुशवाह, राजपाल वर्मा, सागर पाटेकर, सनोज गुप्ता, नगीना यादव, केदार कुशवाह, आकाश घोणे, तसेच व्यापारी संघटना, टेम्पो संघटना, इको संघटना, रिक्षा संघटना यांचे पदाधिकारी, सदस्य, असंख्य नागरिक उपस्थित होते.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या प्रकल्प संचालक यांना दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे कि आंबेवाडी-वरसगांव हद्दीतील रस्ता रुंदीकरणाचे काम गेली १५ वर्षांपासून सुरु असुन सदर रस्ता रुंदीकरणामध्ये आमच्या जागा, जमिनी, घरे बाधित झाली आहेत. आपल्या खात्यामार्फत जेव्हा या रस्त्याच्या कामाला सुरूवात झाली तेव्हा येथील नागरिकांना विश्वासात न घेता, जनसुनावणी न घेता महामार्गाचे काम चालु केले आहे. या व्हेईकल अंडरपासची लांबी जवळपास १ किमीच्या आसपास आहे.

रस्त्याच्या दोन्ही बाजूला राहणाऱ्या नागरिकांना एका बाजूला जायचे असल्यास ५०० मिटर अंतरावर चालत जाऊन व्हेईकल अंडरपासच्या खालील रस्त्यावरून जावे लागणार आहे. नागरिकांना दोन छोटे बॉक्स टाईप दोन्ही बाजूला येण्याजाण्यासाठी मिळावे. ग्रामपंचायत हद्दीतील काम गतवर्षांपासून चालु झाले असुन सर्व्हिस रोड ते गटार यामधील एक मीटर जागेमध्ये आम्हाला डांबरीकरण करून मिळावे. गटाराला रेफलेक्टर बोर्ड सुद्धा लावून मिळावे. अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# तळे मराठी शाळेच्या नूतनीकरण कामाचे भूमिपूजन संपन्न

। तळा । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषदेच्या तळे मराठी दगडी) शाळेच्या नूतनीकरण कामाचे भूमिपूजन तळ्यातील सुप्रसिद्ध डॉ.सतिश वडके व उद्योजक किरण देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले.

तळा शहरातील रायगड जिल्हा परिषदेच्या तळे मराठी (दगडी शाळा)शाळेच्या नूतनीकरणासाठी समाजसेविका अरुणा बापट यांनी पाच लक्ष रुपयांचा निधी दिला आहे.या कामाला दिवाळी पासून सुरुवात करण्यात आली असून या कामाचा भूमिपूजन डॉ.सतिश वडके यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक, उद्योजक किरण देशमुख, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भास्कर गोळे,मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर यांसह सर्व शिक्षकवर्ग व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदिवासींना दिवाळी भेट



। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

अहिंसा संघ संचलित भायखळा महावीर प्रसादम, सुकृत ग्रुप तर्फे पोटलज बुद्रुक येथे डुबेवाडी, आसनेवाडी येथील ६०० आदिवासी नागरिकांना दिवाळी निमित्त साहित्य भेट देण्यात आले.

सुकृत ग्रुपच्या वतीने ४५० अधिवासी नागरिकांना, पोटलज बुद्रुक येथील १०० नागरिकांना प्रत्येकी ब्लँकेट, ताट,वाटी, चमचा, ग्लास, बुंदी तर १५० विद्यार्थ्यांना स्कुल किटचे वाटप करण्यात आले. उपस्थित नागरिकांना १०० डझन केली तर विद्यार्थ्यांना चॉकलेट देण्यात आली. हे साहित्य भूमिपुत्र दिलीप धनावडे यांच्या प्रयत्नातून उपलब्ध झाले. हे साहित्य स्वीकारताना आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून सुकृत ग्रुपच्या मंडळींना खूप समाधान वाटले.

यावेळी या कार्यक्रमासाठी संजय लोढा, शमाबेन लोढा, ऋद्धि लोढा, द्रुती लोढा, उषा लोढा, कुमारपाल जैन, चिराग कोटारी, पर्व कोटारी, सुरेश जैन, कलावती जैन, स्वेता जैन, दिया जैन, क्रिशा जैन, सुधीर धनावडे, अंकुश धनावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत गाव खोपोली येथील मोजमापित ३०६९६८ चौ. मी. क्षेत्रफळाच्या सीटीएस क्र.१६८७/२ धारक जमिनीसंदर्भात (सदर मालमत्ता) महिंद्रा ॲन्ड महिंद्रा लिमिटेड (मालक) - कंपन्या कायदा, १९५६ च्या तरतुदी अंतर्गत संस्थापित एक पब्लिक लिमिटेड कंपनी व कंपन्या कायदा, २०१३ अंतर्गत एक विद्यमान कंपनी, त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : गेटवे बिल्डिंग, अपोलो बंदर, मुंबई - ४०० ००१ यांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करीत आहोत.

सर्व संबंधितांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, एखादा घटक/व्यक्ती, यांमध्ये कोणतीही बँक वा वित्तीय संस्था, नॉन बँकिंग वित्तीय संस्था यांचा समावेश असेल, परंतु त्यापर्यंतच मर्यादित नसेल, संस्था, व्यक्तींची संघटना वा व्यक्तींचे मंडळ (संस्थापित असो वा नसो), हिंदू अविभक्त कुटुंब (एचयूएफ), देणेकरी व/वा धनको यांचा सदर जागा वा तिचा कोणताही भाग वा त्यावरील बांधकामावर वा संदर्भात मालकांच्या माध्यमातून वा अन्य कोणत्याही स्वरूपात यामध्ये विकास हक्क, कायद्याच्या अंमलबजावणीअंतर्गत एफएसआय/टीडीआर वा अन्य कोणत्याही स्वरूपात, यामध्ये उत्तराधिकार, विमिमय, हिस्सा, संपादन, विभाजन, हस्तांतरण, करार, विक्री, अभिहस्तांकन, मृत्यूपश्चात वारसा, प्रभार, गहाण, तारण-गहाण, वहिवाट, परवानगी, उप-परवानगी, भाडेकरार, उप-भाडेकरार, धारणाधिकार, विचाराधीन विवाद, हक्क मार्ग, अनुज्ञप्ती, गहाण, हमी, सुविधाधिकार, भेट, न्यास, देखभाल, ताबा, आरक्षण, निषेधाज्ञा, कर्जे, आगाऊ रकमा, जप्ती वा भार, निषेधाज्ञा वा कोणत्याही न्यासाअंतर्गत लाभ हक्क, पूर्वक्रय अधिकार वा जुना वहिवाट हक्क वा कोणतेही कंत्राट/करार/विक्री कराराअंतर्गत, सहमती वा अन्य वासलाती वा अन्य कोणत्याही स्वरूपात वा प्रलंबित दावाखटला, भागीदारी, संयुक्त उद्यम, कुटुंब व्यवस्था/तडजोड वा कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण वा महसूल प्राधिकारी यांच्याद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकूमाअंतर्गत वा अन्य स्वरूपात, यामध्ये कायद्याच्या अंमलबजावणीचा समावेश असेल, यांसंदर्भात कोणताही लाभ, हरकत, दावा, हिस्सा, हक्क, अधिकार, हितसंबंध वा मागणी असल्यास, त्यांनी त्यासंदर्भात त्यांचा हिस्सा किंवा दावा काही असल्यास, कागदोपत्री पुराव्यासहित लिखित स्वरूपात अधोहस्ताक्षरितांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील निर्देशित पत्त्यावर सूचित करावे.

प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत आम्हाला सहाय्यक दस्तावेजांसमवेत अशी कोणतीही सूचना/दावा प्राप्त न झाल्यास, मालकांचा सदर मालमत्तेमध्ये संपूर्णहक्क आहे असे समजण्यात येईल व सदर मालमत्तेसंदर्भात असा कोणताही विपरीत हक्क, अधिकार, हितसंबंध वा मागणी नाही व सदर मालमत्ता ही भारांपासून मुक्त आहे असे समजण्यात येईल.

**अनुसूची**

गाव खोपोली, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथील मोजमापित अंदाजे ३,०६,९६८ चौ. मी. क्षेत्रफळाच्या सीटीएस क्र. १६८७/२ धारक जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड.

दिनांक : २३ सप्टेंबर, २०२५

**सुहेल अहमद खिलजी**
भागीदार
TATVALEGAL
**तत्व लीगल - मुंबई**
वकील व सॉलिसिटर्स
१०१, १ ला मजला, जन्मभूमी भवन,
जन्मभूमी मार्ग, फोर्ट - ४०० ००१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे किकवी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ७६/२ | एकूण क्षेत्र ०-३२-०० हे.आर. | ०.२८ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- २२/१०/२०२५
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं. १४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण.जि.रायगड
पिन नं. ४०२१०७

## ग्रुप ग्रामपंचायत भाले, ता.माणगांव, जि. रायगड. जाहीर निविदा

नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि.२०/१०/२०२५

ग्रुप ग्रामपंचायत भाले यांचेकडील१५ वा वित्त आयोग अंतर्गत खालील कामांकरिता अधिकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामांचे नांव | योजनेचे नाव | अंदाजीत रक्कम | निविदा फी | निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | निविदा उघडणेचा दिनांक | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कचरा व्यवस्थापनासाठी उपकरणे. | १५ वा वित्त आयोग | ६५२५०/- | २००/- | २९/१०/२०२५ | ३०/१०/२०२५ | २ महिने |
| २ | आशा सेविका आरोग्य विषयक कीट देणे. | १५ वा वित्त आयोग | ३००००/- | २००/- | २९/१०/२०२५ | ३०/१०/२०२५ | २ महिने |
| ३ | बोंडशेत न.पा.पु. योजना क्र. १ मोबाईलद्वारे सुरु करणे. | १५ वा वित्त आयोग | ११६३०/- | २००/- | २९/१०/२०२५ | ३०/१०/२०२५ | २ महिने |
| ४ | जावटे न.पा.पु. योजना क्र.१ मोबाईलद्वारे सुरु करणे. | १५ वा वित्त आयोग | ११६३०/- | २००/- | २९/१०/२०२५ | ३०/१०/२०२५ | २ महिने |
| ५ | कांदळगाव खु. न.पा.पु. योजना क्र.१ मोबाईलद्वारे सुरु करणे. | १५ वा वित्त आयोग | ११६३०/- | २००/- | २९/१०/२०२५ | ३०/१०/२०२५ | २ महिने |
| ६ | चांदेवाडी न.पा.पु. योजना क्र.१ मोबाईलद्वारे सुरु करणे. | १५ वा वित्त आयोग | ११६३०/- | २००/- | २९/१०/२०२५ | ३०/१०/२०२५ | २ महिने |
| ७ | बोंडशेत न.पा.पु. योजना क्र.२ मोबाईलद्वारे सुरु करणे. | १५ वा वित्त आयोग | ८६९७/- | २००/- | २९/१०/२०२५ | ३०/१०/२०२५ | २ महिने |

**अटी व शर्ती :-** १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. २९/१०/२०२५ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. १३) मा. उपअभियंता (ग्रा.पा.पु/बांध. ) उपविभाग माणगांव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा. सरपंच ग्रा.पं. भाले यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

# रेश्मा धुमाळ शिवभूमी आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित



। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यातील मजगांव येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका तथा विषय शिक्षिका रेश्मा धुमाळ यांना राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते अलिबाग येथील आर.सी.एफ कॉलनी येथे झालेल्या कार्यक्रमात रायगड जिल्हा परिषदेतर्फे महाराष्ट्र शासनाचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकारी नेहा भोसले, शिक्षणाधिकारी ललिता दहितुले, उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे मान्यवर उपस्थित होते.

माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा मूर येथे सन.१९९५ पासून रेश्मा धुमाळ सेवेत रुजू झाल्या. शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असताना त्यांनी विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून तळागाळातील विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक उपक्रम राबवले. विद्यार्थी गुणवत्ता वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवले, शिष्यवृत्ती सराव वर्ग, जादा क्लास, गृहभेटी देवून दुर्गम भागातील मुलांचा शोध घेऊन शाळेत दाखल करण्याचे कार्य त्यांनी प्रभावीपणे केले. कोरोना सारख्या महामारीत विद्यार्थ्यांच्या घरी जावून अध्यापन कार्य केले आणि विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले. त्यांना सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची विशेष आवड असून मुरुड तालुक्यात नाविण्यपुर्ण उपक्रम राबवणाऱ्या शिक्षिका म्हणून नावलौकिक कमावला आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| २/१/अ | एकूण क्षेत्र १-०१-०० हे.आर. या पैकी हरिश्चंद्र चंदन शेळके यांचे मालकीचे खाते क्र.२५१ ज्याचे क्षेत्र ०-६१-०० हे.आर.या मिळकतीबाबत | ०.५६ |
| १८/१/अ | एकूण क्षेत्र १-६९-०० हे.आर. | ०.५६ |
| ७/२ | एकूण क्षेत्र २-९६-०० हे.आर. या पैकी एकनाथ मनोहर रसाळ यांचे मालकीचे खाते क्र. २५४ ज्याचे एकूण क्षेत्र ०-७३-०० हे.आर या मिळकतीबाबत | ०.१५ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- २२/१०/२०२५
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं. १४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण.जि.रायगड पिन नं. ४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे खानंद, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३४/१७ | एकूण क्षेत्र ०-४६-०० हे.आर. | ०.३० |
| १/४/अ/१ | एकूण क्षेत्र ०-२९-०० हे.आर. | ०.०० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- २२/१०/२०२५
सही/-
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं. १४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण.जि.रायगड पिन नं. ४०२१०७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-आर्ढे ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलानी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकांचे नांव | स.नं. | हि. नंबर | क्षेत्र हे.आर.पा. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| ज्योती दिपक कुडके व इतर | ४३ | ७ | १-०६-० पो.ख.०-०८-० | ०.८५ |
| | २० | ३ | १-०९-० पो.ख. ०-२०-० | ०.६९ |
| | २२ | २/ड | १-४३-० पो.ख.०-३३-० | ०.९१ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील जमिन मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दत्तात्रेय गंगाराम मुंबईकर व इतर ५ रा.चेहेर यांचेकडून सदर खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

गाव येसदे येथील मिळकतीचे वर्णन :-

| गाव | भुमापन कमांक व उपविभाग | ला.पो. क्षेत्र | पो.ख. | एकूण क्षेत्र हे.आर | आकारणी रू.पै | लागवड |
|---|---|---|---|---|---|---|
| चेहेर | १८/१/अ | ०.०५.१० | ०.१२.२० | ०.१७.३० | ०.३५ | भात |

तरी वरील नमुद मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा करून घेण्याकरीता सदरची नोटीस देण्यात येत आहे. तरी देखील या मिळतीमध्ये इतर कोणाचेही गहान दान, लिज, फरोक्त, भागीदार, बक्षिस, मृत्यूपत्रांकित दान, तावेकब्जा, कुळवहिवाट, बोजा,चार्ज, पोटगी, हक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पधंरा दिवसांत लेखी स्वरूपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी या मुदतीमध्ये कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे आमचे समजून अशिल खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकतीचे आमचे अशिलांवर बंधनकाराक राहणार नाहीत कागदोपत्री पुरावा न जोडलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक :-२०/१०/२०२५
सही/-
**ॲड. सचिन दत्तात्रेय पाटील**
मु.येसदे, पो.वळके, ता.मुरूड, जि.रायगड

## जाहिर सुचना

याद्वारे सूचना देण्यात येते कि, आम्ही १) श्रीमती नफीसा आदिल मोलूभॉय, २) श्री. आदिल शरीफ मोलूभॉय, ३) श्री. वासुदेवन राममूर्ती, ४) श्रीमती ललिता वासुदेवन, ५ ) मुस्तफा ख्वाजा हमीद आणि ६) श्रीमती गीता अमर लुल्ला (ममालक १) यांच्यात यात याखाली लिहिलेल्या पहिल्या परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिनीच्या संबंधातील ('मालक १ जमिन') आणि १) श्री. आदिल शरीफ मोलूभॉय आणि २) श्रीमती नफीसा आदिल मोलूभॉय ('मालक २') यांच्या मौजे पालव, ता. अलिबाग, जि. रायगड महाराष्ट्र येथील यात याखाली लिहिलेल्या दुसऱ्या परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या एकूण २५.१४ एकर जमिनीच्या संबंधातील ('मालक २ जमिन') सर्व अधिकार, हक्क आणि हितसंबंधांची चौकशी करीत आहोत. सर्व व्यक्ती/संस्था तसेच व्यक्तिगत, हिंदू अविभाजित कुटुंब, एखादी बँक आणि/किंवा वित्तीय संस्था किंवा नॉन बॅकींग वित्तीय संस्था, व्यक्तींची समिती किंवा व्यक्तिगत निकाय, मग ते प्रस्थापित असो किंवा अप्रस्थापित असो यांचा मालकांविरुद्ध आणि/किंवा सदर मालमत्तेच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, अदलाबदल, भाडे, भाडेपट्टा, पोट भाडेपट्टा, अनुज्ञप्ती, अभिहस्तांकन, गहाण (समन्याय किंवा अन्य), वारसा, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, बक्षिस, धारणाधिकार, आकार, परिरक्षा, सुविधाधिकार, न्यास, कब्जा, जप्ती, व्यादेश, प्रलंबित वाद, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश, करार / करारनामे, विकासाधिकार, प्रकल्प व्यवस्थापन अधिकार, विकास व्यवस्थापन अधिकार, एफएसआय/टीडीआर वापर/हस्तांतरण, भागिदारी किंवा कोणत्याही स्वरुपाचे अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, दावा, लाभ, मागणी किंवा हितसंबंध असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना खालील नमूद केलेल्या पत्त्यावर/ईमेल आयडीवर यातील तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत दस्तावेजी पुराव्यासह लेखी स्वरुपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे अन्यथा अशा प्रकारचा दावा/मागणी/आक्षेप आणि/ किंवा दावे मागण्या/आक्षेप, जर काही असतील तर त्यांचा अधित्याग आणि/किंवा परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल या जाहीर सुचनेला प्रतिसाद देऊन संबोधित केलेल्या सर्व दाव्यांना/मागण्यांना आणि आक्षेपांना संदर्भ क्र.G0642 दिला पाहिजे.

**परिशिष्ट**
**मौजे पालव, ता. अलिबाग, जि. रायगड महाराष्ट्र**
**येथील जमिनीचे सर्व तुकडे आणि भाग :**
**पहिली (मालक १ च्या जमिनींचे वर्णन )**

| अनु. क्र. | सर्व्हे क्र. | क्षेत्र (हे-आर) |
|---|---|---|
| १ | ३८/१ | ०.३०.३५ |
| २ | ३८/२ | ०.३०.३५ |
| ३ | ३८/३ | ०.३०.३५ |
| ४ | ३८/४ | ०.३०.३५ |
| ५ | ३८/५ | ०.३०.३५ |
| ६ | ३८/६ | ०.३०.३५ |
| ७ | ३८/७/ब | ०.७९.०० |
| ८ | ३८/८ | ०.३४.४० |
| ९ | ३८/९ | ०.३२.३७ |
| १० | ३८/१० | ०.३५.४१ |
| ११ | ३८/११ | ०.३५.४१ |
| १२ | ३९/३ | ०.३१.३६ |
| १३ | ३९/४ | ०.३१.३६ |
| १४ | ३९/८ | ०.३१.३० |
| १५ | ३९/१० | ०.३८.०० |
| १६ | ३९/११ | ०.३१.३० |
| १७ | ३९/१२ | ०.३१.३० |
| १८ | ३९/१३ | ०.३८.०० |
| १९ | ३९/१४ | ०.३२.०० |
| २० | ३९/१५ | ०.८८.४० |
| २१ | ४०/१६ | ०.३३.०० |
| २२ | ४०/१७ | ०.३१.९० |

**दुसरी (मालक २ च्या जमिनींचे वर्णन)**

| अनु. क्र. | सर्व्हे क्र. | क्षेत्र (हे-आर) |
|---|---|---|
| १ | ३९/१/२ | ०.६२.६० |
| २ | ४०/३/४/१ | ०.२२.०० |
| ३ | ४०/५ | ०.३१.०० |
| ४ | ४३/८/१ | ०.७३.७४ |

आज दि.२० ऑक्टोबर,२०२५
सही/-
**ॲड. रश्मी शिंदे**
सरीता सदन, जे.एस.एम.कॉलेज रोड, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ८३८०८०८००२
ईमेल-adv.rashmishinde11@gmail.com

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रात प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# निवडक

## पाकने वर्षभरात बदलला तिसरा कप्तान

**लाहोर :** पाकिस्तान क्रिकेटमध्ये कॅप्टन बदलण्याचा संगीत खुर्ची उपक्रम सुरूच आहे. रावळपिंडी टेस्ट सुरू असतानाच पाकिस्तानने नव्या वनडे कर्णधाराची घोषणा केली आहे. विकेटकीपर बॅट्समन मोहम्मद रिझवानच्या ऐवजी वेगवान गोलंदाज शाहीन शहा आफ्रिदीकडे वनडे संघाची सूत्रं सोपवण्यात आली आहेत. दक्षिण आफ्रिकेविरुद्धची वनडे सीरिज आफ्रिदीसाठी पहिली मोहीम असेल. आशिया चषकाची ट्रॉफी स्वत:कडे ठेवणाऱ्या मोहसीन नक्वींच्या कार्यकाळात पाकिस्तानचा हा तिसरा कर्णधार असेल. आफ्रिदीने पाकिस्तान संघाचं नेतृत्व करण्याची ही पहिलीच वेळ नाही. गेल्या वर्षी आफ्रिदीकडे पाकिस्तानच्या टी २० संघाची धुरा सोपवण्यात आली होती. न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत त्याने पाकिस्तान संघाचं नेतृत्व केलं. पाकिस्तानला पाचपैकी एक सामना जिंकता आला होता. काही महिन्यांनंतर आफ्रिदीकडून कर्णधारपद काढून घेण्यात आलं. बाबर आझमची कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली. मात्र त्यालाही अपयश आल्याने सलमान अली अघाकडे टी २० संघाची सूत्रं देण्यात आली.वनडे आणि टी २० प्रकारातील प्रशिक्षक माईक हेसन, हाय परफॉर्मन्स डिरेक्टर आकिब जावेद आणि निवडसमिती यांच्यातील बैठकीनंतर आफ्रिदीला वनडे कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आलं. रिझवानने २० वनडेत पाकिस्तानचं नेतृत्व केलं. रिझवानच्या नेतृत्वात पाकिस्तानने ऑस्ट्रेलियाला २-१ असं नमवलं. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ३-० असं निर्भेळ यश मिळवलं. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत मात्र पाकिस्तानची कामगिरी सर्वसाधारण राहिली. दोन सामन्यांनंतर पाकिस्तानचं स्पर्धेतलं आव्हान संपुष्टात आलं. वनडे कर्णधार म्हणून रिझवानच्या नावावर ९ विजय आणि ११ पराभव आहेत.रिझवान आणि आफ्रिदी दोघेही रावळपिंडी टेस्ट खेळत आहेत. टेस्ट सुरू असतानाच पहिल्या दिवसाच्या खेळानंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने ही घोषणा केली.

## डॅनियल नरोडित्स्की यांचे निधन

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ जगतातून एक अत्यंत दुःखद बातमी समोर आली आहे. अमेरिकेचा प्रख्यात बुद्धिबळपटू आणि ग्रँडमास्टर डॅनियल नरोडित्स्की याचे वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी अचानक निधन झाले आहे. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण क्रीडा विश्वात शोककळा पसरली आहे.चार्लोट बुद्धिबळ केंद्राने सोमवारी एक निवेदन जारी करून नरोडित्स्की यांच्या निधनाची माहिती दिली. त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही, तसेच त्यांच्या कुटुंबियांनीही याबाबत कोणतीही माहिती दिलेली नाही.डॅनियल नरोडित्स्की हा अमेरिकेच्या बुद्धिबळ क्षेत्रातील सर्वात हुशार आणि आश्वासक प्रतिभांपैकी एक होता. त्याने वयाच्या १८ व्या वर्षी ग्रँडमास्टरचा किताब पटकावला होता. डॅनियल हा केवळ खेळाडूच नव्हता तर एक उत्कृष्ट बुद्धिबळ समालोचक आणि लेखकही होता. वयाच्या १४ व्या वर्षीच मास्टरिंग पोझिशनल चेस नावाचे पहिले पुस्तक प्रकाशित केले होते. त्याचे वडील व्लादिमीर युक्रेनचे, आई लीना अझरबैजानची होती. नुकतीच यूएस नॅशनल ब्लिट्झ चॅम्पियनशिप जिंकली होती. विश्वनाथन आनंद यांच्याकडून शोक व्यक्त नरोडित्स्की यांच्या निधनानंतर भारताचे महान बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद यांनी दुःख व्यक्त केले आहे.

## स्मृतीने मोडला मिताली राजचा विक्रम

**मुंबई :** वुमन्स वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत टीम इंडियाची स्थिती नाजूक आहे. उपांत्य फेरीत जागा मिळवायची तर उर्वरित दोन्ही सामने जिंकणं भाग आहे. असं असताना स्मृती मंधानाला सूर गवसला ही जमेची बाजू आहे. इंग्लंडविरुद्धचा सामना गमावला असला तरी तिने ८८ धावांची खेळी केली. यासह तिने एक विक्रम नावावर केला आहे. स्मृती मंधानाने अर्धशतकी खेळीसह माजी क्रिकेटपटू मिताली राजचा विक्रम मोडला आहे.



महिला वनडे क्रिकेटमध्ये भारताता सर्वाधिक ५० हून अधिका धावा करणारी फलंदाज ठरली आहे. यात आणखी भर पडण्याची शक्यता आहे. वनडे क्रिकेटमध्ये घरच्या मैदानावर ५०हून अधिक धावा करण्याचा विक्रम न्यूझीलंडच्या सुझी बेट्सच्या नावावर आहे. तिने २८ वेळा ही कामगिरी केली आहे. आता स्मृती मंधाना या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. स्मृती मंधानाच्या नावावर २३ अर्धशतकं झाली आहे. स्मृती मंधानाने या वर्षात नवव्यांदा ५० किंवा त्याहून अधिक धावा केल्या आहेत. वनडे वर्ल्डकप स्पर्धेत सुरुवातीच्या तीन सामन्यात फेल गेल्यानंतर ऑस्ट्रेलियाविरुद्ध ८० आणि इंग्लंडविरुद्ध ८८ धावांची खेळी केली.मंधानाने साखळी फेरीत न्यूझीलंड आणि बांगलादेशविरुद्ध अर्धशतकी खेळी केली तर आणखी एक विक्रम नावावर होईल. एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक ५० किंवा त्याहून अधिक धावा करणारी महिला फलंदाज ठरेल.

## बीसीसीआयचा मोहसीन नक्वींना इशारा



**नवी दिल्ली :** आशिया चषक २०२५ मधील ट्रॉफीचा वाद अद्याप कायम आहे. आशिया चषक २०२५ विजेत्या भारतीय संघाला अद्याप ट्रॉफी देण्यात आलेली नाही. भारतीय संघाने जेतेपद पटकावल्यानंतर आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्याकडून ट्रॉफी घेण्यास नकार दिला होता. यानंतर मोहसीन नक्वी ट्रॉफी घेऊन निघून गेले आणि ती ट्रॉफी आता दुबईच्या कार्यालयात ठेवण्यात आली. यासंबंधित आता मोहसीन नक्वींना सक्त ताकीद दिली आहे.बीसीसीआयने आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांना पत्र लिहून या प्रकरणी इशारा दिल्याचे वृत्त आहे. बीसीसीआयने आपल्या पत्रात म्हटलं आहे की जर मोहसिन नक्वी यांनी आशिया चषक ट्रॉफी भारताला दिली नाही तर त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील. बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया म्हणाले की, जर मोहसीन नक्वी यांनी ट्रॉफीच्या मुद्द्यावर कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिला नाही तर बीसीसीआय टप्प्याटप्प्याने कारवाई करतील. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आशियाई क्रिकेट परिषदचे प्रमुख मोहसिन नक्वी यांना अधिकृत ईमेल पाठवत आशिया चषकाची ट्रॉफी भारताला देण्याची मागणी केली आहे.

# ऋषभ पंत कर्णधार, तर साई सुदर्शन उपकर्णधार

## दक्षिण आफ्रिकेविरूद्ध मालिकेसाठी भारत अ संघाची घोषणा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलियाविरूद्ध मालिकेनंतर भारतीय संघ मायदेशात दक्षिण आफ्रिकेविरूद्ध कसोटी मालिका खेळणार आहे. या मालिकेपूर्वी भारत अ संघ दक्षिण आफ्रिका अ संघाविरूद्ध चार दिवसीय सामने खेळणार आहे. या मालिकेसाठी बीसीसीआयने भारतीय संघाची घोषणा केली आहे. हे सामने बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलेन्समध्ये बंगळुरूत खेळवला जाणार आहे.

दक्षिण आफ्रिका अ संघाविरूद्धच्या मालिकेतील पहिला सामना ३० ऑक्टोबरला होणार आहे. तर दुसरा सामना ६ नोव्हेंबर रोजी खेळवला जाईल. दोन्ही सामने सकाळी ९.३० वाजता सुरू होतील. या दोन्ही सामन्यांसाठी भारताच्या अ संघाचे कर्णधारपद ऋषभ पंतकडे असणार आहे. इंग्लंडविरूद्ध मालिकेतील



दुखापतीनंतर ऋषभ पंत पुन्हा एकदा मैदानावर पुनरागमनासाठी सज्ज झाला आहे. ऋषभ पंतला भारत अ संघाच्या नेतृत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. दोन्ही सामन्यांसाठी संघ वेगवेगळा आहे. पहिला सामना सुरू असताना भारतीय संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असणार आहे. तर दुसऱ्या सामन्यासाठी केएल राहुल, ध्रुव जुरेल, मोहम्मद सिराज, प्रसिध हे खेळाडू संघाचा भाग असतील. तर पहिल्या सामन्यात सलामीवीर म्हणून आयुष म्हात्रेला संधी देण्यात आली आहे. तर साई सुदर्शन उपकर्णधार असेल.

### पहिल्या चार दिवसीय सामन्यासाठी भारत अ संघ:

ऋषभ पंत (कर्णधार/यष्टीरक्षक), आयुष म्हात्रे, एन जगदीसन (यष्टीरक्षक), साई सुदर्शन (उपकर्णधार), देवदत्त पडिक्कल, रजत पाटीदार, हर्ष दुबे, तनुष कोटियन, मानव सुथार, अंशुल कंबोज, यश ठाकूर, सारांश जैन

### दुसऱ्या चार दिवसीय सामन्यासाठी भारत अ संघ:

ऋषभ पंत (कर्णधार/यष्टीरक्षक), केएल राहुल, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), साई सुदर्शन (उपकर्णधार), देवदत्त पडिक्कल, ऋतुराज गायकवाड, हर्ष दुबे, तनुष कोटियन, मानव सुथार, खलील अहमद, गुरनूर ब्रार, अभिमन्यू ईश्वरन, प्रसिध कृष्णा, मोहम्मद सिराज, आकाशदीप

**भारत अ वि. दक्षिण आफ्रिका अ संघाची चार दिवसीय कसोटी मालिका**

भारत अ वि. दक्षिण आफ्रिका अ, ३० ऑक्टोबर २०२५ , ९.३० वाजता

भारत अ वि. दक्षिण आफ्रिका अ, ६ नोव्हेंबर २०२५ , ९.३० वाजता

# श्रीलंकेच्या विजयाने भारताचा मार्ग सुकर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बांगलादेश हा आयसीसी महिला वन डे वर्ल्ड कप स्पर्धेतून बाद होणारा पहिला संघ ठरला. श्रीलंकेच्या विजयामुळे टीम इंडियाचा उपांत्य फेरीत जाण्याचा मार्ग अधिक सोपा झाला आहे.

न्यूझीलंडचा पुढील सामना भारताविरुद्ध आहे आणि हा त्यांच्यासाठी डू ऑर डाय असा सामना आहे. या सामन्यातील पराभव त्यांचे वर्ल्ड कप स्पर्धेतील आव्हान साखळी फेरीतच संपुष्टात आणेल. पण, त्यांनी उर्वरित दोन सामने जिंकले, तर ते उपांत्य फेरीत पोहोचतील.न्यूझीलंडने जर भारताला पराभूत केले आणि इंग्लंडकडून हरले, तर बांगलादेशने भारतावर विजय मिळवण्यासाठी त्यांना प्रार्थना करावी लागेल. श्रीलंका आणि पाकिस्तान हेही प्रत्येकी ६ गुणांवर साखळी फेरी संपवू शकतात. अशा वेळी नेट रन रेट महत्त्वाचा ठरेल. त्याचवेळी न्यूझीलंडने भारतावर विजय मिळवला आणि इंग्लंडविरुद्धचा सामना पावसामुळे रद्द झाला, तरी ते उपांत्य फेरीत पोहोचतील. उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी श्रीलंकेला पाकिस्तानला पराभूत करावे लागेल



आणि उर्वरित दोन्ही सामन्यांत भारताचा पराभव आवश्यक आहे. त्याचवेळी इंग्लंडचा न्यूझीलंडवर विजय, असा निकाल त्यांना हवा असेल. या परिस्थितीत श्रीलंकेचे सहा गुण होतील आणि ते किवींना मागे टाकतील. भारतीय महिला संघाने पुढील सामन्यात न्यूझीलंडला पराभूत केल्यास त्यांचा उपांत्य फेरीतील प्रवेश पक्का होईल. पण, गुरुवारी होणारा सामना गमावल्यास इंग्लंडकडून न्यूझीलंडच्या पराभवाची भारताला प्रार्थना करावी लागेल. त्याचवेळी बांगलादेशवर विजय मिळवावा लागेल.न्यूझीलंडविरुद्धचा सामना पावसामुळे रद्द झाल्यास टीम इंडियाचा फायदा आहे, मग ते बांगलादेशविरुद्ध हरले तरी फार फरक पडणार नाही. पण, जर पाकिस्तान आणि श्रीलंका या दोन्ही संघांनी प्रत्येकी ६ गुणांवर स्पर्धा संपवल्यास भारताला बाहेर जावे लागेल.

# ऐन दिवाळीत प्रो-कबड्डी लीगच्या चाहत्यांवर शोककळा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

प्रो कबड्डी लीग कुटुंबावर ऐन दिवाळीत शोककळा पसरली आहे. जयपूर पिंक पँथर्सचे सहायक व्यवस्थापक वेदांत देवाडिगा यांचे वयाच्या २३ व्या वर्षी निधन झाले, तर यू मुंबाचा युवा खेळाडू ए बालाभारती यानेही वयाच्या २० व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. ऐन दीपावलीत प्रो कबड्डी लीगशी निगडित दोन युवा सदस्यांच्या मृत्यूच्या बातमीने क्रीडा विश्वाला मोठा धक्का बसला आहे.

जयपूर पिंक पँथर्सने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत सहाय्यक व्यवस्थापकाच्या निधनावर दुःख व्यक्त केले आहे. जयपुर पिंक पँथर्स परिवार आमच्या सहायक व्यवस्थापक वेदांत देवाडिगा यांच्या अकाली निधनाने अत्यंत शोकाकुल झाला आहे.

### यू मुंबाच्या युवा कबड्डीपटूसह जयपूर पिंक पँथर सदस्याच्या मृत्यूने धक्का

यू मुंबाचे युवा खेळाडू बालाभारती हे एक उदयोन्मुख खेळाडू म्हणून ओळखले जात होते. त्यांची कबड्डीतील कामगिरी वाखाणण्याजोगी होती. कमी वयातच त्यांनी आपल्या कौशल्याने प्रेक्षकांची मने जिंकली होती.या दोन घटनांनी मोठी पोकळी निर्माण केली आहे. वेदांत देवाडिगा आणि बालाभारती हे दोघेही आपल्या तरुण वयातच काळाच्या पडद्याआड गेले, ज्यामुळे क्रीडा जगतात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# रोनाल्डोचा गोवा दौरा दिवास्वप्न

## अल नासरच्या एएफसी चॅम्पियन्स लीग २ फुटबॉल सामन्यातून माघार

**। पणजी । प्रतिनिधी ।**

पोर्तुगीज सुपरस्टार, पाच वेळचा सर्वोत्तम जागतिक फुटबॉलपटू किताबाचा मानकरी ख्रिस्तियानो रोनाल्डो गोव्यात स्पर्धात्मक फुटबॉल खेळण्याच्या शक्यतेला सोमवारी तडा गेला. सौदी अरेबियातील अल नासर क्लब कर्णधाराविना एफसी गोवाविरुद्धच्या लढतीसाठी रवाना झाल्याचे वृत्त आहे.

एएफसी चॅम्पियन्स लीग २ फुटबॉल स्पर्धेच्या ड गटातील सामना बुधवारी फातोर्डा-मडगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर खेळला जाणार आहे. सौदी अरेबियन क्लब सोमवारी रात्री उशिरा गोव्यातील दाबोळी विमानतळावर दाखल होईल, त्यानंतर मंगळवारी या संघाच्या



प्रशिक्षकाची अधिकृत स्पर्धा पत्रकार परिषद नियोजित आहे.

रोनाल्डो अल नासर क्लबसमवेत प्रवास करत नसल्याची माहिती आहे, याचाच अर्थ तो गोव्यातील सामन्यात खेळणार नाही, मात्र इतर प्रमुख खेळाडू लिव्हरपूल क्लबचा माजी दिग्गज सादियो माने, स्पॅनिश जुवाव फेलिक्स संघासमवेत येत आहेत. गोवा पोलिसांच्या सूचनेवरून सुरक्षिततेच्या कारणास्तव एफसी गोवा संघाने अल नासर क्लबशी रोनाल्डोच्या आगमनाविषयी वारंवार विनंती केली, परंतु सौदी अरेबियन क्लबने त्याबाबत स्पष्ट काहीच कळविले नाही.

या क्लबचे दोन तांत्रिकविषयक अधिकारी दोन दिवसांपूर्वी गोव्यात पाहणीसाठी आले होते. त्यांनी राज्याचे क्रीडामंत्री रमेश तवडकर, तसेच इतर संबंधित प्रमुख अधिकाऱ्यांशी सामन्याच्या तयारीविषयी चर्चा केली होती, परंतु रोनाल्डो येण्याविषयी वाच्छता केली नव्हती. गोवा पोलिसांनाही त्यांनी माहिती दिली नव्हती.

### रोनाल्डोची मागील दोन सामन्यांत अनुपस्थिती

४० वर्षीय रोनाल्डो पोर्तुगाल संघाचा हुकमी खेळाडू असून, पुढील वर्षी होणाऱ्या विश्वकरंडक स्पर्धेत खेळण्यास इच्छुक आहे. सौदी अरेबियातील अल नासर क्लबशी तो २०२७ पर्यंत करारबद्ध आहे. या क्लबच्या बाहेरगावच्या सामन्यात रोनाल्डो आपल्या मर्जीनुसार खेळू शकतो या अटीचा करारात समावेश आहे. एएफसी चॅम्पियन्स लीग २ स्पर्धेत अल नासर क्लबने आपले ड गटातील दोन्ही सामने जिंकले आहेत, मात्र या लढतींत रोनाल्डो खेळला नव्हता. अल झावरा क्लबविरुद्धच्या लढतीसाठी तो इराकला गेला नव्हता.

# रावळपिंडी टेस्ट मॅचमध्ये हनुमानाच्या भक्ताने पाकिस्तानला दिला दणका

**। रावळपिंडी । वृत्तसंस्था ।**

रावळपिंडी येथे सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात पाकिस्तानच्या पहिल्या डावाचा शेवट झाला आहे. पाकिस्तानचा पहिला डाव संपवण्यात दक्षिण आफ्रिकेकडून खेळणाऱ्या हनुमानाच्या भक्ताने महत्वाची भूमिका बजावली.

आम्ही बोलतोय भारतीय वंशाच्या केशव महाराजबद्दल. तो दक्षिण आफ्रिकेकडून खेळतो. केशव महाराज हनुमानाचा मोठा भक्त आहे. हिंदू धर्मावर त्याची श्रद्धा आहे. सध्या त्याने रावळपिंडी टेस्टमध्ये आपल्या गोलंदाजीने प्रतिस्पर्धी संघाला नामोहराम करुन सोडलय.



दक्षिण आफ्रिकेचा स्पिनर केशव महाराज ग्रोइन इंजरीचा सामना करत होता. त्या दुखापतीमुळे त्याला लाहोरमध्ये पाकिस्तान विरुद्ध पहिला कसोटी सामना खेळता आला नाही. यात दक्षिण आफ्रिकेला ९३ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला.

रावळपिंडीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या कसोटी सामन्यात त्याने दमदार पुनरागमन केलं आणि कमालीची गोलंदाजी केली. केशव महाराजने पाकिस्तान विरुद्ध रावळपिंडी टेस्टमध्ये पहिल्या डावात ४२.४ ओव्हर गोलंदाजी केली. त्याने १०२ धावा देऊन ७ विकेट काढले.नऊ वर्षात टेस्ट करिअरमध्ये एका इनिंगमध्ये पाचपेक्षा जास्त विकेट घेण्याची त्याची ही १२ वी वेळ आहे. याआधी दोनवेळा एका इनिंगमध्ये ७-७ विकेट घेण्याचा कारनामा केशव महाराजने बांग्लादेश विरुद्ध वर्ष २०२२ मध्ये केला होता.

# वीरेंद्र सेहवागचा घटस्फोट होणार?

नवी दिल्ली : भारतीय संघात आपल्या स्फोटक फलंदाजीमुळे प्रसिद्ध असलेला, शानदार फलंदाज वीरेंद्र सेहवाग हा सध्या त्याच्या पर्सनल लाईफमुळे चर्चेत आहे. त्याची पत्नी आरती व सेहवाग यांच्यात सगळं आलबेल नसल्याच्या चर्चा काही काळापासून सुरू होत्या. काही महिन्यांपूर्वीच त्यांच्या घटस्फोटाबद्दलही अफवा उडाल्या होत्या. त्यानंतर अशीही बातमी समोर आली की सेहवागच्या मित्राशी आरतीचं अफेर आहे. यावर त्या दोघांपैकी कोणीच काही बोललं नव्हतं. मात्र आता दिवाळीनिमित्त सेहवागने शेअर केलेल्या फोटोमुळे हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

# एलिसा सहाव्या सामन्यातून आऊट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आयसीसी वनडे वुमन्स वर्ल्ड कपस्पर्धा रंगतदार स्थितीत पोहचली आहे. या स्पर्धेत एकूण ८ सघांनी प्रत्येकी किमान ५ सामने खेळले आहेत. या स्पर्धेत आतापर्यंत ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंड या ३ संघांनी उपांत्य फेरीत धडक दिली आहे. उंपात्य फेरीतील एका जागेसाठी न्यूझीलंड आणि टीम इंडिया यांच्याच जोरदार चुरस आहे.

दुसऱ्या बाजूला या स्पर्धेत आतापर्यंत अजिंक्य असलेल्या ऑस्ट्रेलियाला मोठा झटका लागला आहे. ऑस्ट्रेलियाच्या या स्पर्धेतील सहाव्या सामन्याआधी अडचणीत वाढ झाली आहे. ऑस्ट्रेलियाची कॅप्टन एलिसा हीली हीला दुखापतीमुळे सहाव्या सामन्यात खेळता येणार नाहीय. आयसीसीने याबाबतची माहिती दिली आहे. ऑस्ट्रेलिया या मोहिमेतील आपल्या सहाव्या सामन्यात २२ ऑक्टोबरला इंग्लंड विरुद्ध भिडणार आहे.

एलिसा हीली हीला गेल्या शनिवारी दुखापत झाली होती. एलिसाला सरावादरम्यान दुखापत झाली होती. त्यामुळे एलिसा इंग्लंड विरूद्धच्या सामन्यात खेळणार नसल्याची माहिती टीम मॅनजमेंटकडून देण्यात आली आहे. तसेच एलिसाच्या फिटनेसकडेही लक्ष देण्यात येणार असल्याचंही टीम मॅनेजमेंटकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. त्यामुळे एलिसा या मोहिमेतील आपला सातवा आणि शेवटचा सामना खेळेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला सुरूवात | इंडोनेशियाच्या खेळाडूंबरोबर होणार सामना

# सात्त्विक-चिराग जोडीकडे लक्ष

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

सात्त्विक साईराज रंकीरेड्डी व चिराग शेट्टी या भारताच्या आघाडीच्या पुरुष दुहेरी जोडीकडून मंगळवारपासून सुरू झालेल्या फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत (सुपर ७५० दर्जा) चमकदार कामगिरीची अपेक्षा असेल.

जागतिक क्रमवारीत सहाव्या स्थानी असणारी भारतीय जोडी गेल्या आठवड्यात डेन्मार्क स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पराभूत झाली होती. त्यापूर्वी, हाँगकाँग आणि चीन मास्टर्सच्या अंतिम फेरीत त्यांनी धडक मारली होती. फ्रेंच स्पर्धेतील पहिल्या सामन्यात ते इंडोनेशियाच्या



मुहम्मद रियान अर्दियांतो व रहमत हिदायत या जोडीविरुद्ध खेळतील.

सात्त्विक-चिरागने २०२२ आणि २०२४ मध्ये फ्रेंच स्पर्धेचे जेतेपद मिळवले होते. याच कामगिरीची पुनरावृत्ती करण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. त्यांनी यावर्षी पॅरिस येथे जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत दुसरे कांस्यपदक मिळवले होते.

भारताच्या अन्य खेळाडूंमध्ये हाँगकाँग स्पर्धेची अंतिम फेरी गाठणाऱ्या लक्ष्य सेनसमोर पुन्हा एकदा आयर्लंडच्या नहत गुयेनचे आव्हान असेल. तर, अमेरिकन स्पर्धेचे जेतेपद मिळवणाऱ्या आयुष शेट्टीचा सामना जपानच्या कोकी वतनबेशी असेल. महिला एकेरीत अनमोल खरबसमोर पहिल्या फेरीत कोरियाच्या अग्रमानांकित एन से-यंगचे आव्हान असणार आहे. अनुपमा उपाध्यायची गाठ चीनच्या चौथ्या मानांकित हान यू तर, उन्नति हुडाशी गाठ मलेशियाच्या करुपाथेवन लेत्शानाशी पडेल. पुरुष दुहेरीत पृथ्वी कृष्णमूर्ति रॉय आणि साई प्रतीक आव्हान उपस्थित करतील. तसेच, महिला दुहेरीत कविप्रिया सेल्वम और सिमरन सिंग तसेच, पांडा भगिनी रुतुपर्णा आणि श्वेतपर्णा यांच्यात पहिल्या फेरीचा सामना होईल. मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला व तनिषा क्रॅस्टो आणि रोहन कपूर व रुत्विका शिवानी गड्डे चमकदार कामगिरी करण्यास उत्सुक असतील.

# बांगलादेशचा पराभवासह पॅकअप

**नवी दिल्ली :** श्रीलंकेने आयसीसी वूमन्स वनडे वर्ल्ड कप २०२५ स्पर्धेतील २१ व्या सामन्यात बांगलादेशच्या तोंडातील विजयाचा घास हिसकावला आहे. श्रीलंकेने बांगलादेश विजयासाठी २०३ धावांचं आव्हान दिलं होतं. बांगलादेशला शेवटच्या ओव्हरमध्ये विजयासाठी ९ धावांची गरज होती. मात्र चमारी अटापटूने ५० व्या ओव्हरमध्ये यशस्वीरित्या ९ धावांचा बचाव केला. चमारी अट्टापट्टू हीने बांगलादेशला शेवटच्या ओव्हरमधील पहिल्या ४ बॉलमध्ये ४ झटके दिले. बांगलादेशने पाचव्या बॉलवर १ धाव घेतली. तर चमरीने सहाव्या चेंडूवर धाव दिली नाही. श्रीलंकेने अशाप्रकारे या स्पर्धेतील पहिलावहिला विजय ७ धावांनी मिळवला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)